सेव्हींग व करंट खात्यांवर मिळवा 7% व्याजदर
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी डेडगांवकर
Since 1935
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर. फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, शनिवार दि. २३.०५.२०२६ | अंक नं. ०४५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

अधिक मास आता बनवा अधिक खास
23 व 24 मे 2026
CKJ मधील सोन्याचा भाव
22 कॅरेट सोन्याचा भाव (प्रती ग्रॅम) ₹14499/-*
Conditions Apply*
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹999/-*
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02


अधिक मासातील खास स्पेशल धोंडा थाळी
पूरण पोळी, आमटी, आमरस, पनीर भाजी, सूकी भाजी, आलू रजवडी, दालफ्राय अजुन बरेच काही..
स्पेशल आमरस 400/- किलो
महेंद्र पेढावाला रजवाडी गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध : रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय
कापड बाजार, अहिल्यानगर.

# अहिल्यानगर जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा सुरळीत पुरवठा राखत समानतेने वाटप करा

## कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पेट्रोल पंप परिसरात पोलीस पेट्रोलिंग वाढविण्यात यावी : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

नगर – जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा सुरळीत पुरवठा राखण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. पेट्रोल, डिझेलचा काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच प्रत्येक तालुक्यात इंधनाचे समानतेने वाटप करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पेट्रोल, डिझेल पुरवठ्याबाबत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. बैठकीस अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांच्यासह विविध कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच पेट्रोल डिलर्स असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, पुणे आणि मनमाड येथील इंधन डेपो निर्धारित वेळेपेक्षा अधिक वेळ सुरु ठेवून जिल्ह्यातील पेट्रोल पंपांना इंधनाचा अविरत पुरवठा होईल याची दक्षता घ्यावी. नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

इंधन वाटपावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पेट्रोल पंप परिसरात पोलीस पेट्रोलिंग वाढविण्यात यावी. जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर नागरिकांना सुरळीत सेवा मिळणे आवश्यक असून पेट्रोलपंप चालकांनी ग्राहकांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी. पुरवठा साखळी सक्षम ठेवणे तसेच नागरिकांना वेळेत इंधन उपलब्ध करून देण्यासाठी समन्वयाने कार्य करण्यावर भर देण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी केल्या.

बैठकीत जिल्ह्यातील पेट्रोल आणि डिझेल साठा, पुरवठा व्यवस्था, वाहतूक समन्वय तसेच विविध तालुक्यांतील इंधन उपलब्धतेबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
रत्नकमल चहा
10 किलो मागे 1 मोठी पिशवी फ्री..फ्री..
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरुर तुलना करुन पहा
आशिष ट्रेडर्स
Contact : 8767369367
इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.

क्वॉलिटीत भारी.. किंमतीत कमी
पुरुषांसाठी व मोठ्या मुलांसाठी बिगसाईज ब्रॅण्डेड रेडिमेड कपडे
शर्ट,क्वाडशेट 7XL पर्यंत | टिशर्ट 6XL पर्यंत | नाईटपॅन्ट 4XL पर्यंत | जिन्स,फॉर्मल पॅन्ट 44 साईज पर्यंत
किंमत होलसेल व ऑनलाईन पेक्षा स्वस्त
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
वेळ : सकाळी १०.३० ते रात्री ८.३० पर्यंत
पुरुषांसाठी सर्व काही
मयुरी लेडिज मॉलच्या वर
शुभ मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188



२५ वे पुण्यस्मरण
लोकसेवेचे व्रत आपण जीवनभर जपले
स्वतः चंदनापरी झिजुन इतरांना सुगंध देत राहीले
सुसंस्कार समय सूचकता सर्वांवर असलेली प्रेमभावना यामुळेच आपण वंदणीय झाले
आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली..
कै. स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रय शंकरराव मडकर
स्व.दि. २३/५/२००१
दुःखांकित
सौ. नुतन रमाकांत । डॉ. रमाकांत मडकर
सौ. सुरेखा भीमाशंकर शेळके । डॉ. किरण । कु.डॉ. श्रुती
समस्त मडकर परिवार

फ्लेक्स प्रिंटींग
संपर्क : 9403232323



भावपूर्ण श्रद्धांजली
स्व. सरदार प्रिथपालसिंग धुप्पर
स्व. दि. १४/५/२०२६
राधाकृष्ण मंदिर ट्रस्टचे विश्वस्त शांत, संयमी आणि सेवाभावी व्यक्तीमत्व
स्व. सरदार प्रिथपालसिंग धुप्पर
यांच्या अकस्मित निधनामूळे ट्रस्ट तर्फे यांना भावपुर्ण श्रद्धांजली..
अध्यक्ष व सर्व ट्रस्टी
पंजाबी सनातन धर्मसभा व राधा-कृष्ण मंदिर ट्रस्ट
सर्जेपूरा, अहिल्यानगर

महात्मा फुले जन आरोग्य योजना
सर्व रंगाच्या शिधापत्रिका धारकांना मिळणार योजनेचा लाभ
MJPJAY
फक्त लहान मुलांसाठी मोफत आंतररुग्ण सेवा
अक्षय मुलांचे हॉस्पिटल व प्रसुतिगृह
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटी शेजारी, अ.नगर येथे उपलब्ध आहे.
त्यासाठी लागणारे कागदपत्रे : १) रेशन कार्ड सर्व रंगाचे २) आयुष्मान कार्ड कुटुंबातील व्यक्तिचे ३) आधारकार्ड रुग्णाचे
अक्षय (गिते) हॉस्पिटल
डॉ.अनिरुध्द गिते (MBBS, MD paeds)
मो : 9511110444 / 9881800444

Leh Ladakh
Starts @ For 6 nights 7 Days 19950/-
Packages Available 5D, 6D, 7D...11D
Namoh Since 1981 A Total Travel Solution...
For details contact :- 73505 30009 | 73505 40009 | 73505 50009
www.namohtours.com
Ticket Bookings | Hotel Bookings | International & Domestic Tours | Railway Tours | Customized Tours | Corporate Tours | Group Tours | MICE | Insurance | Passport/ Visa

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शिक्षकांचे प्रश्न २५ मेपर्यंत न सोडवल्यास तीव्र आंदोलन

## माध्यमिक शिक्षक संघाची शिक्षण आयुक्तांसोबत बैठक, विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक चर्चा : आ. सत्यजित तांबे

नगर – शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांच्या उपस्थितीत तसेच आमदार सत्यजित तांबे, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ. महेश पालकर आणि शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांच्यासोबत पुणे येथे नुकतेच बैठक पार पडली. या बैठकीस नाशिक विभागातील सर्व शिक्षणाधिकारी ऑनलाईन उपस्थित होते. या बैठकीत महाराष्ट्र शिक्षक संघटनेच्या वतीने एस. डी. भिरुड, राज्य फेडरेशन संघाचे कोषाध्यक्ष राजेंद्र लांडे, शिक्षक नेते तसेच चेअरमन आप्पासाहेब शिंदे, दिलीप काटे तसेच अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे, सेक्रेटरी अमोल ठाणगे व दिपक दरेकर यांनी सहभाग घेतला.



शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांच्या उपस्थितीत व आमदार सत्यजित तांबे, शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर आणि शिक्षण संचालक शरद गोसावी यांच्यासोबत पुणे येथे बैठक पार पडली.

बैठकीमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये शिक्षकांचे रखडलेले वेतन, संच मान्यता, दप्तर दिरंगाई, शालार्थ मान्यता, पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापक मान्यता, डी.एड.–बी.एड. प्रमोशन मान्यता, अकरावी प्रवेश प्रक्रिया, समायोजन, शालार्थ आयडी तसेच विविध प्रशासकीय कामांमध्ये होणारी अडवणूक आदी विषयांचा समावेश होता.

तसेच बैठकीमध्ये अंशतः अनुदानित शिक्षकांचे नियमित वेतन, शालार्थ आयडी प्रकरणे, संच मान्यतेतील त्रुटी, शिक्षक भरती प्रक्रियेतील अडचणी, रोस्टर तपासणी, समायोजन, टीईटी अट, डीसीपीएस प्रकरणे, पर्यवेक्षक व मुख्याध्यापक मान्यता, टप्पा अनुदान, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन, प्राथमिक व माध्यमिक विभागातील प्रलंबित विषय, अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पवित्र पोर्टलमधील तांत्रिक त्रुटी तसेच ग्रामीण व आदिवासी भागातील शिक्षकांच्या प्रश्नांवरही सकारात्मक चर्चा करण्यात आली. संघटनेने शिक्षण विभागासमोर विविध मागण्यांचे निवेदन सादर करून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण विभागाकडे विविध प्रलंबित विषय तत्काळ मार्गी लावण्याची म ागणी केली. शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रश्नांमुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात अडचणीत असल्याचे बैठकीत निर्दशनास आणून देण्यात आले. यावेळी शिक्षण आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांनी प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेत लवकरात लवकर योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. मात्र, प्रलंबित प्रश्नांचे तातडीने निराकरण न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र शिक्षक संघटनेच्या वतीने देण्यात आला.

# गुंतवणूक वाढते आहे पण दिशा ठरली आहे का?



राजन कुटे

अलीकडे अनेक जण नियमित गुंतवणूक करत आहेत. उत्पन्न वाढतं, बचत वाढते आणि हळूहळू वेगवेगळ्या प्रकारच्या गुंतवणुकी जमा होत जातात. बाजार तेजीतअसताना सुरू केलेला एखादा म्युच्युअल फंड, सुरक्षिततेसाठी घेतलेली एखादी पॉलिसी, मनःशांतीसाठी ठेवलेली एफडी, कोणी एकाने सांगितलं म्हणून घेतलेले काही शेअर्स आणि कधी कधी फक्त इतर लोक करत आहेत म्हणून केलेली आणखी एखादी गुंतवणूक.

कागदावर पाहिलं तर सगळीकडे गुंतवणूक पसरलेली दिसते. तरीही अनेक गुंतवणूकदारांच्या मनात एक प्रकारची अनिश्चितता कायम असते. काही दिवसांपूर्वी चर्चेदरम्यान एक व्यक्ती अगदी प्रामाणिकपणे म्हणाले – गुंतवणूक तर अनेक वर्षांपासून करतोय, पण हे सगळं मला खरंच कुठे घेऊन जात आहे का, हेच समजत नाही. कदाचित हा प्रश्न रोजच्या बाजारातील चढउतारांपेक्षा जास्त महत्त्वाचा आहे.

कारण आज अनेक लोकांची अडचण गुंतवणुकीच्या पर्यायांची कमतरता नाही, उलट पर्याय इतके जास्त आहेत की नेमकी दिशा हरवते. पैसा गुंतत राहतो, पण त्यामागचं कारण हळूहळू अस्पष्ट होत जातं.

इथेच स्पष्टता महत्त्वाची ठरते. मोठमोठे आर्थिक शब्द किंवा अवघड गणितांसाठी नाही, तर पैसा नेमका कशासाठी आहे हे समजण्यासाठी.

एखाद्यासाठी याचा अर्थ निवृत्तीनंतर दुसऱ्यांवर आर्थिकदृष्ट्या अवलंबून राहावं लागू नये हा असू शकतो, कुणासाठी मुलांचं शिक्षण आर्थिक ताणाशिवाय पूर्ण करता यावं हा असू शकतो, तर काहींसाठी अनिश्चित काळातही स्थैर्य टिकून राहणं महत्त्वाचं असतं. वरून पाहिलं तर या साध्या गोष्टी वाटतात, पण अनेक वर्षं त्या आर्थिक निर्णय आणि मनःशांती घडवत असतात.

गुंतवणूक स्पष्ट ध्येयाशी जोडली गेली की आणखी एक बदल घडतो,तो म्हणजे बाजारातील तात्पुरती घसरण कमी भयावह वाटू लागते. प्रत्येक पडझड अपयश वाटत नाही. संयम राखणं थोडं सोपं होतं, कारण लक्ष रोजच्या हालचालींपेक्षा दीर्घकालीन दिशेकडे वळू लागतं.

अनेक गुंतवणूकदार वर्षानुवर्षे परतावे पाहतात; पण आपल्या गुंतवणुकी खरंच आपल्याला हवं असलेलं आयुष्य उभारायला मदत करत आहेत का, हे तपासण्यासाठी थांबत नाहीत, की त्या फक्त वेगवेगळ्या टप्प्यांवर घेतलेल्या स्वतंत्र आर्थिक निर्णयांची यादी बनून राहिल्या आहेत?

अर्थपूर्ण संपत्ती निर्माण करणं हे सतत प्रतिक्रिया देण्यातून घडत नाही. ते अनेकदा शांतपणे घडतं – सातत्य, रचना, संयम आणि काही स्पष्ट प्राधान्यांशी दीर्घकाळ जोडून राहिल्याने.

शेवटी काय, काही टप्प्यावर प्रत्येक गुंतवणूकदाराने स्वतःला एक साधा प्रश्न विचारण्याची गरज असते – माझ्या गुंतवणुकी वाढत आहेत का एवढंच नाही, तर त्या मला योग्य दिशेने घेऊन जात आहेत का?

शांत ठेवा, स्पष्ट ठेवा.

– **राजन कुटे**, अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# अपहृत मुलाचा शोध घेत असलेल्या दोन पोलिसांवर नऊ जणांचा हल्ला

## कोल्हार घाट परिसरातील घटना; चार आरोपींना अटक, ५ जण फरार

नगर – अपहरण झालेल्या मुलाचा शोध घेत असलेल्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांवर ९ जणांच्या टोळक्याने हल्ला करुन मारहाण करण्यात आली. तसेच पोलिसांकडे असलेला मोबाईल हिसकावून घेत शासकीय तपासाच्या कामात अडथळा आणला. ही घटना कोल्हार घाट (ता. नगर) येथील हॉटेल दोस्तीसमोर २२ मे रोजी दुपारी २.३० वाजता घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात ९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

नगर तालुका पोलीस ठाण्यातील अंमलदार खंडेराव शिंदे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीनुसार शिंदे हे पोलीस कॉन्स्टेबल विक्रांत भालसिंग यांच्यासह अपहृत बालकाचा शोध घेत होते. हे दोघे कोल्हार घाट येथील हॉटेल दोस्तीसमोर असताना तेथे आरोपी संतोष कुटे, रामेश्वर पालवे, ज्ञानेश्वर पालवे (रा. कोल्हार), तेजस जावळे (रा. उदरमल) व इतर ४ ते ५ अनोळखी इसम आले. हे दोघे पोलीस कर्मचारी असल्याचे व तपासासबंधी आल्याचे माहिती असतानाही आरोपींनी त्यांना बेकायदेशीर जमाव जमवून धक्काबुकी, शिवीगाळ करीत मारहाण केली. तसेच भालसिंग यांच्या खिशातील मोबाईल फोन जबरदस्तीने काढून घेतला. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे, पोलीस उपनिरीक्षक विनोद परदेशी, मनोज मोंढे यांनी घटनास्थळी भेट दिली. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यातील अंमलदार खंडेराव शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एम.आय.डी. सी. पोलीस ठाण्यात शासकीय कर्मचाऱ्यावर हल्ला आणि सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी आरोपींना तातडीने अटक करण्याचे आदेश दिले. त्यानुसार एमआयडीसीचे प्रभारी गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने आरोपींचा शोध घेवून कोल्हार येथून दोघांना तर उदरमल येथून दोघांना अटक केली. संतोष कुटे, रामेश्वर पालवे, ज्ञानेश्वर पालवे (रा. कोल्हार), तेजस जावळे (रा. उदरमल) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. इतर उर्वरित आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे आणि एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे करत आहेत.

# गाडी धुण्याच्या वादातून रॉड व शस्त्राने हल्ला

नगर – शहरातील तोफखाना परिसरातील सातभाई गल्लीत गाडी धुण्याच्या क्षुल्लक कारणावरून एका तरुणावर आणि त्याच्या मित्रावर लोखंडी रॉड आणि धारदार शस्त्राने भीषण हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आरोपी चेतन मोडक याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शुभम भाऊसाहेब थोरात (वय २८) या तरुणाने पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.


फिर्यादी शुभम थोरात आणि त्याचा मित्र प्रणय नवनाथ तुपे हे घरामागे मोटारसायकल धुवत असताना, तिथे राहणारा चेतन मोडक हा दुचाकीवरून आला. त्याने त्याचीही दुचाकी धुवून देण्यास सांगितले. शुभम गाडीवर पाणी मारत असताना चेतनच्या अंगावर पाण्याचे काही थेंब उडाले. याच कारणावरून संतापलेल्या चेतनने शिवीगाळ करत शुभम आणि प्रणय यांना लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली. तसेच धारदार शस्त्राने वार केले. या हल्ल्यात शुभमच्या हाताला दुखापत झाली, तर त्याचा मित्र प्रणय याच्या उजव्या कानाला धारदार शस्त्राने वार केल्यामुळे तो गंभीर जखमी झाला आहे. जखमींना तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू करण्यात आला असून, पुढील कारवाई पोलीस हवालदार संतोष गर्जे करत आहेत.

# तरुणीचा पाठलाग करून विनयभंग करणारा १२ तासांत जेरबंद

नगर – तरुणीचा मोटारसायकलवरून पाठलाग करून हातवारे व अश्लील बोलून विनयभंग करणाऱ्या आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या १२ तासांत जेरबंद केले. बंटी उर्फ संकेत ससाणे (रा. सिद्धार्थनगर, अहिल्यानगर) असे आरोपीचे नाव आहे.

२० मे रोजी रात्री ९ ते ११ वाजण्याच्या सुमारास पीडित तरुणी तिच्या मैत्रिणीला भेटून ॲक्टिव्हा दुचाकीवरून व्ही स्टार हॉटेलसमोरील रस्त्याने घरी जात असताना आरोपीने मोटारसायकलवरून तिचा पाठलाग केला. तसेच हातवारे करून व बोलून तिला लज्जा उत्पन्न होईल, भावना दुखावतील असे कृत्य केले. हा प्रकार पीडितेने मोबाईलमध्ये चित्रित केला होता. त्यानंतर संबंधित व्हिडीओ इन्स्टाग्रामवर व्हायरल करून आरोपीची ओळख पटविण्याचे आवाहन करण्यात आले होते. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आरोपीस तात्काळ ताब्यात घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गुप्त माहिती व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा शोध घेत त्यास ताब्यात घेण्यात आले. दरम्यान, आरोपीविरुद्ध आणखी एका तत्सम घटनेची तक्रार प्राप्त झाली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून तपास तोफखाना पोलीस करत आहेत.

# नामदेव तनपुरे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी नामदेव भाऊ तनपुरे (वय ७०) यांचे २३ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राजेंद्र तनपुरे यांचे वडील होत.

# एका शेतजमिनीचा व्यवहार ठरलेला असताना कादगपत्रांत फेरफार करुन दुसरीकडचीच जमिन नावावर करुन घेतली

नगर – जमिनीच्या एका गट नंबरचा व्यवहार ठरलेला असताना कागदपत्रांमध्ये लबाडीने बदल करून दुसऱ्याच गट नंबरमधील शेतजमीन खरेदी करुन जमीन मालकाची फसवणूक प्रकरणी नवनागापूर एमआयडीसी पोलीस ठाण्यात ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत राहुल छगनलाल फिरोदिया (वय ४५, धंदा– मेडिकल दुकान, रा. पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीत म्हटले आहे, हा फसवणुकीचा प्रकार २१ फेब्रुवारी २०२६ ते ९ मार्च २०२६ या कालावधीत निंबळक येथील राहुल मेडिकल दुकानामध्ये घडला. फिर्यादी राहुल फिरोदिया यांची संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पठार व शिंदोडी येथे शेतजमीन आहे. यातील हिवरगाव पठार येथील शेतजमीन गट क्रमांक २०९ चा विक्री व्यवहार ठरलेला होता. मात्र, आरोपींनी संगनमत करून खरेदीखताच्या कागदपत्रांमध्ये लबाडीने बदल केला. फिरोदिया यांचा विश्वास संपादन करून आरोपींनी हिवरगाव पठार येथील गट क्रमांक २०९ च्या व्यवहाराच्या कागदपत्रांवर सह्या घेतल्या आणि प्रत्यक्षात फिर्यादीच्या मालकीची शिंदोडी (ता. संगमनेर) येथील शेतजमीन गट क्रमांक २१५ ही लबाडीने खरेदी करून घेत विश्वासघात व फसवणूक केली.

याप्रकरणी पोलिसांनी कविता सोपान धुळगंड, सोपान भिका धुळगंड, शिवाजी बाजीराव चोरमले, दत्तात्रय बाजीराव चोरमले (सर्व रा. मांडवे बुद्रुक, ता. संगमनेर), बाबुराव मारुती खेमनर (रा. साकुर, ता. संगमनेर) आणि प्रमोद सखाराम ढवळे (रा. काकडवाडी, ता. संगमनेर) अशा ६ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि. गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. सांगळे हे करत आहेत.

# हौसाबाई पाचपुते यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – काष्टी, पाचपुतेवाडी येथील रहिवासी हौसाबाई वामनराव पाचपुते (वय ९३) यांचे २२ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर काष्टी येथे घोडनदीतिरी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, ६ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. चंद्रकांत पाचपुते यांच्या त्या मातोश्री होत.

# केडगाव येथील हॉटेल मॅनेजर व कर्मचाऱ्याला बेदम मारहाण; एकावर कोतवालीत गुन्हा दाखल

नगर – काम सोडलेल्या कर्मचाऱ्यास रहावयास जागा दिली म्हणून केडगाव उपनगरातील अर्चना हॉटेलचे मॅनेजर व संबंधित कामगारास त्यांच्या रुममध्ये घुसून जय मल्हार हॉटेलचा मालक विशाल बाळासाहेब राहिंज याने बेदम मारहाण केली. ही घटना २२ मे रोजी पहाटे ४ वाजेच्या सुमारास केडगाव बायपास रोडवरील अर्चना हॉटेलमध्ये घडली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी अर्चना हॉटलेचे मॅनेजर सुभाष सुकारामजी पांगा (वय ४१, मूळ रा. जोधपूर, राजस्थान) यांनी कोतवाली पोलिसांत फिर्याद दिली आहे. या फिर्यादीत म्हटले आहे, फिर्यादी सुभाष पांगा हे अर्चना हॉटेलमध्ये मॅनेजर म्हणून काम करतात. त्यांचे मित्र आलमगीर मंडल हे आधी जय मल्हार हॉटेल येथे कामाला होते. मात्र, पगार न मिळाल्याने आपण गावी जाण्याच्या तयारीत आहोत, असे फोन करुन अर्चना हॉटेलचे मॅनेजर सुभाष पांगा यांना कळविले होते. त्यावेळी पांगा यांनी मंडल यांना गावी जाण्याऐवजी अर्चना हॉटेलच्या रूममध्ये राहण्यास जागा उपलब्ध करुन दिली. याचा राग आल्याने जय मल्हार हॉटेलचा मालक विशाल बाळासाहेब राहिंज हा २२ मे रोजी पहाटे अर्चना हॉटेलमध्ये आला. त्याने दरवाजा उघडून मॅनेजर सुभाष पांगा यांना तुम्ही त्याला इथे राहायला जागा का दिली? असे म्हणून घाण घाण शिवीगाळ केली व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच आरोपी विशाल राहिंज याने आलमगीर मंडल याला हॉटेलच्या बाहेर ओढून मारहाण केली आणि तू जर परत इथे दिसला तर तुझे हात–पाय तोडून टाकीन, अशी जीवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी आरोपी विशाल बाळासाहेब राहिंज याच्याविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार लगड हे करत आहेत.

# अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार केलेला आरोपी स्थानिक गुन्हे शाखेने चिंचपूरमध्ये पकडला



नगर – जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेल्या एका सराईत आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चिंचपूर (ता. पाथर्डी) येथून ताब्यात घेतले. सोनू उर्फ वैभव राजेंद्र बोरुडे (वय ३०, रा. चिंचपूर, ता. पाथर्डी) असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशान्वये व पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार सुरेश माळी, सुयोग सुपेकर, रोहित येमुल व सागर ससाणे यांचे पथक हद्दपार आरोपींचा शोध घेण्यासाठी रवाना करण्यात आले होते. २१ मे २०२६ रोजी पाथर्डी पोलीस ठाणे हद्दीत शोधमोहीम सुरू असताना, गुप्त माहितीदारामार्फत सोनू उर्फ वैभव राजेंद्र बोरुडे हा हद्दपार आदेशाचा भंग करून विनापरवाना चिंचपूर येथे वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली. पथकाने तत्काळ कारवाई करत चिंचपुर येथे जाऊन संशयितास ताब्यात घेतले. चौकशीत त्याची ओळख पटवून हद्दपार अभिलेखांची पडताळणी केली असता, त्यास ५ डिसेंबर २०२५ पासून दोन वर्षांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सागर अशोक ससाणे यांच्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हिराबाई कपिले यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – केडगाव येथील रहिवासी श्रीमती हिराबाई उत्तमराव कपिले (वय ८१) यांचे २३ मे रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर केडगावमधील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. संजय कपिले यांच्या त्या आई होत.

# श्रीमती प्रमिलाताई वाव्हळ यांचे निधन



नगर – येथील श्रीमती प्रमिलाताई बबनराव वाव्हळ (वय ७७) यांचे निधन झाले. नामदेव शिंपी समाज, शिंदे मळा चे माजी विश्वस्त अनिल बबनराव वाव्हळ व सुनिल बबनराव वाव्हळ यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना दोन, ५ नातू असा परिवार आहे.

# जगन्नाथ बोठे पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – वाळकी (ता.जि.अहिल्यानगर) येथील शेतकरी व भागवत धर्माचे प्रसारक जगन्नाथ दगडुजी बोठे पाटील (वय ८७) यांचे २३ मे रोजी दुपारी १२.३० वा. वृद्धापकाळाने निधन झाले. कै. बोठे पाटील यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार ॲड. डॉ. बाळासाहेब बोठे पाटील, वाळकी येथील यशदीप गॅस एजन्सीचे संचालक प्रा. अनुपम बोठे पाटील व वीरपत्नी इंद्रायणी भालसिंग यांचे ते वडील होत. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी सायंकाळी वाळकी (बोठे वस्ती, शिरकांडमळा) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# परमेश्वर काकडे यांचे अपघाती निधन



नगर–बोल्हेगाव, रेणुकानगर, महादेव मंदिराजवळील रहिवासी परमेश्वर दिनकर काकडे (वय ४०) यांचे २१ मे रोजी सदाशिव पेठ, हैद्राबाद येथे अपघाती निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, बहीण, मुले, मुली असा परिवार आहे.

# पूर्ववैमनस्यातून कोयता आणि दांडक्याने जीवघेणा हल्ला; सहा जणांवर गुन्हा दाखल

नगर – केडगाव लिंक रोड परिसरातील एका मैदानात बोलावून जुना वाद मिटवण्याच्या बहाण्याने एका २० वर्षीय तरुणावर कोयता, दगड आणि लाकडी दांडक्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी कोतवाली स्थानिक पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हर्षद जालिंदर साळवे असे हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून त्याच्यावर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

हर्षद साळवे हा महाविद्यालयात शिक्षण घेतो. काही दिवसांपूर्वी माऊ साळवे याने त्याला फोन करून विनाकारण वाद घालत शिवीगाळ केली होती. त्यानंतर कृष्णा त्रिभुवन याने हर्षदला फोन करून जुना वाद मिटवण्याच्या बहाण्याने केडगाव लिंक रोड येथे बोलावले. हर्षद तिथे गेल्यानंतर आरोपींनी त्याला बोलण्यासाठी शेजारच्या मैदानात नेले. मैदानात पोहोचताच हर्षद आरणे, माऊ साळवे, कृष्णा त्रिभुवन, आलेख (पूर्ण नाव माहिती नाही) आणि त्यांच्यासोबत असलेल्या दोन अनोळखी इसमांनी हर्षदला बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी माऊ साळवे याने लाकडी दांडक्याने तर कृष्णा त्रिभुवन याने दगडाने मारले. याच दरम्यान हर्षद आरणे याने दुचाकीच्या डिक्कीतून कोयता काढून हर्षदच्या डोक्यावर वार केला. या हल्ल्यात हर्षद गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात पडला. हल्ला करत असताना एका आरोपीने मोबाईलवर याचा व्हिडिओ देखील बनवला. हल्लेखोर पळून गेल्यानंतर जखमी हर्षदने एका व्यक्तीच्या मोबाईलवरून आपल्या मित्राशी संपर्क साधला. त्यानंतर मित्रांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत त्याला उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. हर्षदच्या डोक्याला गंभीर जखम झाली असून शरीरावर इतर ठिकाणी मोठी दुखापत झाली आहे. पोलिसांनी या प्रकरणी हर्षद आरणे, माऊ साळवे, कृष्णा त्रिभुवन, आलेख आणि दोन अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# मुलीचा विनयभंग करून मारण्याची धमकी

नगर – शहरातील सर्जेपुरा परिसरात एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून तिला व तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही घटना २१ मे रोजी रात्री ९.३० वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आरोपी महेश काळोखे (रा. रंगभवन, सर्जेपुरा, अहिल्यानगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेतील पिडीत मुलगी ही बोल्हेगाव परिसरात राहणारी असून, ती आज्जीकडे आलेली होती. २१ मे रोजी रात्री ९.३० वाजता पीडित अल्पवयीन मुलगी आज्जीच्या घरातून पाणी पिवून बाहेर आली असता आरोपीने तिला अडवून तिच्याशी झटापट केली. तसेच तिला लज्जा उत्पन्न होईल, असे वर्तन करीत तिची छेड काढली. त्याचवेळी तिची मावशी तेथे धावत आली असता आरोपीने पीडितेला धमकी दिली की मावशीला समजावून सांग. नाहीतर तिजा जीवे मारुन टाकीन. तसेच तूर जर कोणाला काही सांगितले तर तुला आणि तुझ्या आईलापण पाहून घेईल, अशी धमकी दिली. या घटनेप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पिडीतेने दिलेल्या तक्रारीवरुन आरोपी महेश काळोखे याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पोक्सो) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तोफखाना पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश गोटला या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### हळदीचा रस अमृतासमान

हळदीचा रस हा आयुर्वेदात अमृतासारखा मानला जातो कारण हळदीत कर्क्युमिन नावाचे नैसर्गिक दाहशामक आणि अँटीऑक्सिडंट तत्व असते. रोज सकाळी उपाशीपोटी कोमट पाण्यात एक चमचा कच्च्या हळदीचा रस मिसळून प्यायल्याने शरीरातील साठलेले विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि रक्त शुद्ध होते. त्यामुळे त्वचा चमकदार होते, मुरुम, डाग आणि सुरकुत्या कमी होतात. हळदीचा रस पचनसंस्था मजबूत करतो, जठरातील आम्लाचे प्रमाण संतुलित ठेवतो आणि गॅस, अपचन, सिडिटी यांसारखे त्रास दूर करतो. यकृत म्हणजे लिव्हरचे कार्य सुधारून फॅटी लिव्हरचा धोका कमी होतो कारण कर्क्युमिन लिव्हरला डिटॉक्स करायला मदत करते. सांधेदुखी, आमवात, संधिवात यामध्ये हळदीचा रस खूप गुणकारी आहे कारण तो सूज आणि वेदना कमी करतो. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी हळदीचा रस उत्तम आहे, वारंवार होणारी सर्दी, खोकला, ताप यांपासून बचाव होतो. हृदयासाठीही हळद चांगली आहे, ती रक्तवाहिन्यांतील कोलेस्टेरॉल कमी करून रक्ताभिसरण सुधारते आणि हृदयविकाराचा धोका कमी करते. मधुमेही रुग्णांसाठी हळदीचा रस फायदेशीर ठरतो कारण तो रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यास मदत करतो.

## पाककला

### पनीर कोल्हापुरी

**साहित्य :** पनीर २५० ग्रॅम, कांदा २ मोठे, टोमॅटो २, सुके खोबरे ३ टेबलस्पून, तीळ १ टेबलस्पून, खसखस १ टीस्पून, धने १.५ टेबलस्पून, जिरे १ टीस्पून, लवंग ५, दालचिनी १ इंच, तमालपत्र १, काळी मिरी १०, सुक्या लाल मिरच्या ८, लसूण १० पाकळ्या, आलं १ इंच, हळद १/२ टीस्पून, लाल तिखट २ टीस्पून, काश्मिरी तिखट १ टीस्पून, तेल ४ टेबलस्पून, मीठ चवीनुसार, कोथिंबीर थोडी, सिमला मिरची १ ऐच्छिक.

**कृती :** खोबरे खमंग भाजून घ्या. त्याच कढईत धने, जिरे, लवंग, दालचिनी, मिरी, तमालपत्र, तीळ, खसखस, सुक्या मिरच्या भाजून घ्या. भाजलेलं खोबरे, मसाले, आलं, लसूण एकत्र मिक्सरमध्ये बारीक वाटून कोल्हापुरी मसाला तयार करा. पनीरला हळद, लाल तिखट, मीठ लावून १० मिनिट ठेवा. नंतर १ टेबलस्पून तेलावर हलकं परतून बाजूला काढा. कढईत ३ टेबलस्पून तेल गरम करून बारीक चिरलेला कांदा गुलाबी परता. त्यात वाटलेला कोल्हापुरी मसाला घालून तेल सुटेपर्यंत ४५ मिनिट परता. हळद, लाल तिखट, काश्मिरी तिखट घालून मिक्स करा. टोमॅटो प्युरी घालून तेल सुटेपर्यंत शिजवा. सिमला मिरची घालून २ मिनिट परता. १ कप गरम पाणी व मीठ घालून उकळी आणा. परतलेलं पनीर ग्रेव्हीत घाला. ३५ मिनिट मंद आचेवर शिजवा. गॅस बंद करून कोथिंबीर घाला. गरम गरम भाकरी किंवा चपाती सोबत द्या.

## वास्तू

### उंबरा नसेल तर...

* उंबरा नसेल तर लाकडी पट्टी बसवून घ्या. तात्पुरता उपाय म्हणून हळदीने रेषा ओढली तरी चालते.

* दक्षिण दिशेला दार असेल तर उंबऱ्यावर पंचमुखी हनुमानाचा फोटो लावा किंवा वास्तुपुरुष यंत्र बसवा. उंबरा म्हणजे घराचा मान. तो स्वच्छ, सुंदर, पवित्र ठेवला तर घरात सुख-समृद्धी नांदते.

## सौंदर्य

* पार्टीला जायच्या आधी मुलतानी माती + गुलाबपाणी पॅक लावा. १० मिनिटात चेहरा ताजा होईल.

* मेकअप आधी चेहऱ्यावर बर्फ चोळा. मेकअप जास्त वेळ टिकतो.

## सल्ला

* तिखटाच्या डब्यात हिंगाचा खडा ठेवा. रंग आणि तिखटपणा टिकतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २४ मे २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ शुक्लपक्ष, पूर्वा २६।५१, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात धावपळ होईल पण यश मिळेल. घरात आनंदाचे वातावरण राहील.

**वृषभ :** आर्थिक लाभाचे योग, जुन्या मित्राची भेट होईल. खाण्यापिण्यावर नियंत्रण ठेवा.

**मिथुन :** प्रवासाचे योग, अभ्यासात लक्ष लागेल. जोडीदारासोबत वेळ घालवाल.

**कर्क:** मन अस्वस्थ राहील, संध्याकाळी शांत वाटेल. खर्च जपून करा.

**सिंह :** आत्मविश्वास वाढेल, रखडलेली कामे होतील. कुटुंबाची साथ मिळेल.

**कन्या :** चिडचिड टाळा, व्यवसायात फायदा होईल. तब्येत उत्तम राहील.

**तूळ :** कलाकारांना मान मिळेल, घरात शुभ कार्य घडेल. प्रेमात गोडवा येईल.

**वृश्चिक :** जुन्या गुंतवणुकीतून फायदा. भावंडांशी वाद नको, वाहन जपून चालवा.


**धनु :** नशिबाची साथ, अडकलेले पैसे येतील. धार्मिक कार्यात मन रमेल.

**मकर :** कामात कौतुक होईल, मुलांकडून आनंदाची बातमी. शांतपणे निर्णय घ्या.


**कुंभ :** मित्रांसोबत मजा येईल. कागदपत्रे वाचून सही करा, विश्रांती घ्या.

**मीन :** नवीन सुरुवात करा, जोडीदाराचा पाठिंबा मिळेल. अचानक धनलाभ होईल.

## शब्दगंध क्र. ७४३६ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७४३५ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) समुदायाने केलेले वगैरे ५) प्रतिष्ठा; पत; मानमरातब ७) विरजलेल्या दुधातले पाणी काढून त्यात मीठ वगैरे घालून केलेले खाद्य ८) भीडभाड न ठेवता बोलणारा; स्पष्टवक्ता १०) गुंड; भामटा; लुच्चा १२) सैन्याला वगैरे पुरविला जाणारा दाणागोटा, शस्त्रे आदी; कुमक १४) हाताच्या किंवा पायाच्या बोटाच्या शेंड्यावर असते ते कवच १५) बारा वर्षांचा काळ; खडतर व्रत १६) जाड दोरी; दोरखंड १८) शरीक; समाविष्ट; सहभागी १९) आतापर्यंतच्या आयुष्याचे मोजमाप २०) दिल्लीतील आंतरराष्ट्रीय विमानतळ (पूर्वीचे नाव) २१) तळहात २२) सुंदर; छान २३) नाटक किंवा चित्रपटात भूमिका करणारा

**उभे शब्द :-** १) सरपटणारा एक जीव ज्यातील काही जाती विषारीही आहेत २) गुमास्ता; अडत्या ३) दारावरचा पहारेकरी ४) शरीरातील तीन दोषांपैकी एक; खोकला ५) मत्सर; द्वेष ६) भिंतीत ठेवलेली पोकळ जागा; जमिनीतील पोकळ जागा ९) कवच; आवरण; साल ११) उवेचे अंडे १३) लग्नात अक्षता टाकताना वधुवराच्या मध्ये धरतात ते कापड १६) एक दिवंगत भारतीय क्रिकेटपटू जो उत्तम क्षेत्ररक्षक म्हणून गणला गेला १७) विमान चालविणारा १८) समोरासमोरची लढाई १९) वडिलोपार्जित चालत आलेली जमीन वगैरे मालमत्ता

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** समुद्राला उथळपणा माहीत नाही, आणि मोठ्या मनाला कमीपणा माहीत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आरशात डावं-उजवं उलटं का दिसतं, पण वर-खाली उलटं का नाही दिसत?

आरसा प्रत्यक्षात डावीकडे-उजवीकडे उलटं करत नाही. तो फक्त समोर आणि मागे एवढाच बदल करतो. आपण आरशासमोर उभे राहिलो की आपले नाक आरशाच्या दिशेने असते, परंतु आरशातील प्रतिमेचे नाक आपल्या दिशेने येते. याचा अर्थ आरशाने पुढील आणि मागील बाजू बदलली. आता आपण उजवा हात वर केला तर आरशातील प्रतिमादेखील तोच हात वर करते. तो हात प्रतिमेचाही उजवाच हात असतो. मात्र तो आपल्याला आपल्या डाव्या बाजूला दिसतो, त्यामुळे डावीकडे-उजवीकडे उलटे झाले असे वाटते.

वास्तविक आपण आरशातील प्रतिमेला समोर उभ्या असलेल्या व्यक्तीसारखे बघतो. समोर उभ्या व्यक्तीचा उजवा हात आपल्या डाव्या बाजूला येतो हा नैसर्गिक नियम आहे. गोंधळ आरशामुळे नाही तर आपल्या आकलनामुळे होतो. वर आणि खाली उलटे का होत नाही, याचे कारण म्हणजे आपले डोके आणि प्रतिमेचे डोके दोन्ही वरच असतात. पाय दोघांचेही खाली असतात. गुरुत्वाकर्षणामुळे वर-खाली ही दिशा निश्चित असते. जर कोणी छताला पाय लावून उलटे लटकले आणि आरशात पाहिले तर त्यांना वर-खाली उलटे झाल्यासारखे वाटेल, कारण तेव्हा त्यांची दिशा बदललेली असते. याचा सोपा पुरावा म्हणजे रुग्णवाहिकेवर एउछ्डणइच असे उलटे लिहिलेले असते. कारण समोरच्या वाहनाच्या आरशात ते AMBULNCE असे सरळ दिसावे. यावरून स्पष्ट होते की आरसा डावीकडे-उजवीकडे नाही तर समोर-मागे बदल करतो.


थोडक्यात आरसा आडवा किंवा उभा नसून आत-बाहेर एवढाच बदल करतो. उर्वरित भ्रम आपले मेंदू तयार करतो, कारण आपण जगाकडे मानवी नजरेतून पाहण्याची सवय लावून घेतलेली आहे.

### योग्य दिशा

एकदा एका घोड्याने कासवाची चेष्टा केली, तू इतका हळू चालतोस. आयुष्यभर कुठेच पोहोचणार नाहीस. कासव शांतपणे म्हणाले, वेग महत्त्वाचा नाही, दिशा महत्त्वाची आहे. तू भरधाव धावतोस हे खरं, पण तुला जायचं कुठे हेच माहीत नसेल तर? घोडा हसला आणि सैरावैरा पळत सुटला. वाटेत तो अनेकदा भरकटला, दमला, पडला. कासव मात्र सावकाश पण एकाच दिशेने चालत राहिले. संध्याकाळी ते नदीकाठी पोहोचले. तिथेच त्याचे घर होते. घोडा अजूनही रानातच भटकत होता.

**बोध :** जलद जाण्यापेक्षा योग्य दिशेने जाणे महत्त्वाचे. ध्येय माहीत नसेल तर वेगाचा काहीच उपयोग नाही.

## जीवन का अमृत (भाग १)



### ज्योती और ध्वनी

६८. सुरत-शब्द योग के सतुरु जब ज्योति और ध्वनि की बात करते है; तो वे संसार की बाहरी ज्योति और ध्वनि की बात नहीं करते, बल्कि अंतर की दिव्य ज्योति और ध्वनि का जिक्र करते हैं।

वे हमें बताते है कि दिव्य ज्योति और ध्वनि, प्रभु की मुख्य अभिव्यक्तियाँ हैं, जिनके द्वारा प्रभु सृष्टि के सामने अपने आपको प्रकट करता है। अपनी असली हालत में न तो प्रभु ज्योति है, न ही ध्वनि, ना तो अँधेरा, न ही चुप्पी । पर जब उसने आकार और रूप धारण किया तो ज्योति और ध्वनि उसके मुख्य रूप बन कर निकले।

६९. आपने जिस शल्य चिकित्सा का जिक्र किया है, वह आप करवा सकते हैं। आप शांत रहें। सिर पर कार्यरत गुरु-शक्ति से हर दया, सहायता और संरक्षण बिना माँगे मिलेगी ।

पर आपको सलाह दी जाती है कि आप शुद्ध शाकाहारी भोजन ही लें, चाहे चिकित्सक इसके विपरीत भी कहें। इस प्रकार आप, सतुरु की दया से, इस अग्नि परीक्षा से सही सलामत बाहर निकल आएँगे।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### विवेकयुक्त विचार

आपण फक्त काम करणारी माणसे नसून चैतन्यशक्ती आहोत ध्यान आणि चिंतन - मला स्वतः कडे लक्ष द्यायचं आहे... मी, या शरीराचा, मनाचा आणि इंद्रियांचा मालक आहे... फक्त मीच मालक आहे... माझा प्रत्येक विचार, भावना आणि कृती ही माझी निर्मिती आहे... काहीही आपोआप घडत नाही... आज मी जे काही करेन, ते करताना मला काय वाटतं याकडे मी लक्ष देईन... आजची डायरी किंवा 'टू-बी लिस्ट' : शांततापूर्ण, संयमी, प्रेमळ, नम्र... माझ्या आजच्या दिवसाचं चित्र मला डोळ्यासमोर आणू दे... मी नेहमीच्या माणसांबरोबर काम करतो आहे... मी शांत, समजूतदार आणि प्रेमळ राहीन... प्रेमळ अस्तित्व हाच माझा मूळ स्वभाव आहे.... ओम शांती!

आपण नेहमी जसा विचार करत आलो तसाच करत राहिलो आणि जे नेहमी करत आलो तेच करत राहिलो तर आपल्याला तेच मिळेल जे नेहमी मिळत आलं. आपले संस्कार बदलण्यासाठी आपल्याला ज्ञानाची आणि सामर्थ्याची गरज आहे. फक्त विवेकयुक्त विचार ऐकल्याने आणि चांगलं वाचण्याने यात काही बदल घडणार नाही.

मन, बुद्धी आणि संस्कार यांनी मिळून आत्मा बनतो. मन विचार निर्माण करतं, बुद्धी निर्णय घेते आणि जो निर्णय सातत्याने कृतीत उतरतो त्यातून संस्कार बनतो. शांती, आनंद आणि आपल्या अस्तित्वाचे इतर गुण अनुभवण्यासाठी आपण काम करत आहोत. आपल्याला वाटलं की कृती केल्याने आपण आपल्या अस्तित्वाचा अनुभव घेऊ शकतो. पण सत्य तर हे आहे की, आपण जेव्हा आपल्या अस्तित्वाचे गुण कृतीत उतरवतो तेव्हाच आपल्याला त्याचा अनुभव घेता येतो. जेव्हा आपण इतरांना ऊर्जा देतो, तेव्हा सर्वप्रथम आपणच त्या ऊर्जेचा अनुभव घेतो, इतरांना देण्यातच आपल्याला मिळतं.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**मुलगा :** बाबा, लग्न म्हणजे काय?

**बाबा :** बाळा, लग्न म्हणजे... एटीएम कार्ड बायकोकडे आणि फक्त बॅलन्स इन्क्वायरी आपल्याकडे.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कोणत्या देशात जगातील सर्वात लांब काचेचा पूल बांधलेला आहे?

– व्हिएतनाम

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'जबाबदारी....'

एका राष्ट्रपुरुषाची जयंती संपूर्ण गावभर मोठ्या उत्साहाने आणि डीजेच्या मोठ्या आवाजात साजरी करण्यात आली. त्या दिवशी संपुर्ण गावाने ओळखले होते की सदर राष्ट्रपुरुषाची जयंती साजरी करणं अर्थात जल्लोषात जयंती साजरी करणं आपल्या संपूर्ण गावाची जबाबदारी आहे. शेजारच्या गावकऱ्यांनीही सदर राष्ट्रपुरुषाची जयंती साजरी केली पण सर्वात महत्वाचं म्हणजे सामाजिक जबाबदारी आहे असा चांगला अर्थ घेऊन. आपल्यावर वैयक्तिक अथवा संपूर्ण गावावर असणारी जबाबदारी पार पाडणं हे अत्यंत महत्वाचं आहे. कर्तव्याची जाणिव असते तशीच जबाबदारीची जाणीव असणं हेसुध्दा महत्वाचं आहे. सर्वात महत्वाचं म्हणजे जबाबदारी हे ओझं वाटता कामा नये आणि जबाबदारी हीसुध्दा कर्तव्य भावनेनं पार पाडणं ह्यासारखा दूसरा आनंद नाही. प्रत्येक जबाबदारी एकट्यावर घेणं हे नक्कीच कालांतराने ओझं होऊ शकतं. कारण वैयक्तिक जबाबदारी पार पाडतांना दमछाक होऊ शकते.

खूपच परिश्रम करावे लागतात. पण काही जबाबदाऱ्या ह्या वैयक्तिक असतात आणि त्या जबाबदाऱ्या पार पाडणं हे महत्वाचंच असतं. पहिल्या गावाने जयंती साजरी करण्याची जबाबदारी पार पाडली पण ती जबाबदारी पार पाडण्यामुळं चांगलं असं काय मिळालं त्या गावाला ? नक्कीच चांगलं असं काहीच मिळालं नाही. दुसऱ्या गावाने जबाबदारी पार पाडतांना आपण नेमकं काय चांगलं असं समाजाला, देशाला देऊ शकतो ह्यासाठी सर्वात आधी गाव बैठक घेतली. त्या बैठकीत ज्या सुचना, विचार आले त्यावर सर्वांगाने विचार केला.

चांगल्या सुचना, विचार ह्या अंमलात आणल्या. चांगल्या सुचना, विचार देणारांचा सन्मान केला कारण हीसुध्दा एक जबाबदारीच आहे. ह्यामुळे सुचना, विचार सांगणारांचं मनोबल वाढलं, त्यांना अत्यानंद झाला आणि आपली वैयक्तिक जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडली ह्याचं समाधान मिळालं. समजा एखाद्या संस्थेच्या एका शाखा कार्यालयास सर्वोत्कृष्ठ शाखा कार्यालय असा पुरस्कार मिळाला तर तो पुरस्कार मिळतांना त्या कार्यालयाने, जबाबदाऱ्याही चांगल्या प्रकारे पार पाडल्या म्हणूनच पुरस्कारासाठी विचार करण्यात आला असा अर्थ निघतो आणि हा अर्थ अगदी बरोबर आहे. समजा त्या विशिष्ठ कार्यालयास सर्वोत्कृष्ठ शाखा कार्यालय पुरस्कार मिळाला नसता तर त्या कार्यालयाने कर्तव्य आणि जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडल्या नाहीत असाच अर्थ निघाला असता. जबाबदारी वैयक्तिक असते तशीच सामुहिक सुध्दा असते.

सामुहिक जबाबदारी ही आपली वैयक्तिक आणि कौटुंबिकसुध्दा असते. अनेक पाल्य, आपल्या वयोवृध्द पालकांची जबाबदारी योग्य काळजी घेऊन, सेवा करुन, जबाबदारी पार पाडतात. एखादा दुसरा पाल्य असाही असतो ज्याला आपल्या वयोवृध्द पालकांचं काही देणं-घेणं नसतं. अथवा तो वयोवृध्द पालकांची जबाबदारी स्वीकारत नाही, व्यवस्थितपणे पार पाडत नाही. हे नक्कीच वाईट आहे. अशा वयोवृध्द पालकांच्या भूमिकेत जाऊन विचार केलाच पाहिजे. ज्यावेळी पाल्य लहान होते त्यावेळी आई, वडिल म्हणून, त्यांनी त्यांचं कर्तव्य, जबाबदाऱ्या योग्य प्रकारे पार पाडल्या आहेत आणि आज जेव्हा वयोवृध्द पालकांना पाल्याची गरज असते तेव्हा मात्र एखादा दुसरा पाल्य जबाबदारी झटकतो हे योग्य नाही, चांगलं नाही. जबाबदारी पार पाडणं हे कर्तव्य भावनेनं झालं पाहिजे.

अमुक एक जबाबदारी माझी नाही हे म्हणण्यापूर्वी सर्वांगाने विचार केलाच पाहिजे. मी जर विद्यार्थी आहे तर अभ्यास रोजच्या रोज करणं ही माझी विद्यार्थी म्हणून जबाबदारी आहेच. तर मी विद्यार्थी असण्याच्या माझ्या ह्या नात्याला शंभर टक्के न्याय देऊ शकतो. अभ्यासात लेखन, गृहपाठ, वाचन इत्यादि महत्वाचं आहे. ज्यावेळी आपण आपल्या जबाबदारीकडे पाठ फिरवु तेव्हा अधोगतीच होणार अर्थात ही अधोगती माझी वैयक्तिक, कौटुंबिकसुध्दा असणार आहे. जबाबदारीची जाण आणि भान प्रत्येकालाच असायला पाहिजे.

ह्याशिवाय जबाबदारी पार पाडणं शक्य होणार नाही. आपली वैयक्तिक जबाबदारी पार पाडुन, दुसऱ्या एखाद्याच्या जबाबदारी पार पाडण्यामध्ये सहकार्य करणं ह्यासारखा आनंद नाही. अशा अनेक व्यक्ती पाहिल्यात, जबाबदारी आनंदाने पार पाडतात म्हणूनच ते समाधानी दिसतात. आनंदाने जबाबदारी पार पाडुया.

(लेख क्र.६०२)

**– सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### कांदा

१३) मज्जासंस्था प्रभावित करण्यासाठी कांद्याचा उपयोग करता येतो. मेंदूचे टॉनिक म्हणूनही त्याचा वापर करता येतो.

१४) जुलाब, उलटी, मळमळ, अपचन अशा विकारांमध्ये कांदा व पुदिना सम प्रमाणात घेऊन त्याचा रस तयार करून त्यात थोडे सैंधव मीठ घालावे व ते मिश्रण प्यावे.

१५) दमा, सर्दी, खोकला हे आजार वाढल्यास, तसेच छातीमध्ये कफ वाढल्यास कांदा, मध व आले यांचे चाटण दिवसातून दोन-तीन वेळा घ्यावे. या चाटणामुळे हे विकार दूर होतात.

१६) चेहरा कांतियुक्त, सतेज दिसण्यासाठी तसेच चेहऱ्यावरील सुरकुत्या नाहीशा करण्यासाठी दोन चमचे कांद्याचा रस, दोन चमचे काकडीचा रस व एक चमचा मध यांचे मिश्रण करून ते चेहऱ्यास लावावे. नियमितपणे हे मिश्रण चेहऱ्यास लावल्यास सुरकुत्या नाहीशा होतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी रेल्वे तातडीने सुरू करा

## पेट्रोल-डिझेल टंचाईवर मात करण्यासाठी रेल्वे हाच प्रभावी पर्याय

नगर – देशात निर्माण होत असलेल्या पेट्रोल-डिझेल टंचाईच्या पार्श्वभूमीवर तसेच पंतप्रधानांनी इंधन बचतीबाबत केलेल्या आवाहनाचा संदर्भ देत अहिल्यानगर ते पुणे इंटरसिटी रेल्वे सेवा तातडीने सुरू करण्यात यावी, अशी मागणी सौ. स्वाती सिरसुल यांनी केली आहे. यासंदर्भातील सविस्तर निवेदन रेल्वेमंत्री, रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना पाठवून त्यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष वेधले आहे.


सौ. स्वाती सिरसुल

गेल्या अनेक वर्षांपासून अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी रेल्वेची मागणी सातत्याने होत असून विविध सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी यासाठी अनेकदा पाठपुरावा केला आहे. या प्रश्नाला व्यापक प्रसिद्धी दिली; मात्र अद्याप प्रत्यक्ष रेल्वे सेवा सुरू झालेली नसल्याने नगरकरांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सौ. सिरसुल यांनी सांगितले की, त्या स्वतः २०२२ पासून या मागणीसाठी सातत्याने प्रयत्न करीत आहेत. गेल्या वर्षी काही कार्यकर्त्यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन निवेदन दिले होते, मात्र त्यानंतरही रेल्वे बोर्डाकडून अपेक्षित कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

रेल्वे विभागाने मागील काही वर्षांत नगरच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कामे केली असल्याचेही त्यांनी नमूद केले. मनमाड ते दौंड या १८४ किलोमीटर अंतरावरील सिंगल लाईनचे डबल लाईनमध्ये रूपांतर करण्यासाठी सर्वेक्षण, प्रकल्प अहवाल तयार करणे, भूसंपादन, विद्युतिकरण, चाचण्या आदी अनेक महत्त्वाच्या प्रक्रिया रेल्वे प्रशासनाने यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. रेल्वे अधिक सुरक्षित आणि वेगवान करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेले योगदान मोलाचे असून त्यांचे कौतुक झाले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नगर-आष्टी रेल्वेला अपेक्षित प्रतिसाद नसतानाही ती सेवा सुरू ठेवण्यात येत असल्याचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी प्रशासनाच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अनेक नागरिकांनी या मार्गावरील रेल्वेमुळे आर्थिक तोटा होत असल्याचे मत व्यक्त केले असतानाही ती सुरू ठेवली जाते; मात्र परळी ते पुणे किंवा मुंबईपर्यंत रेल्वे सुरू केल्यास मोठ्या प्रमाणात प्रवासी प्रतिसाद मिळू शकतो, असे त्यांनी सांगितले.

इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील अलीकडील युद्धपरिस्थितीमुळे जागतिक स्तरावर इंधन संकटाची परिस्थिती निर्माण झाली असून पेट्रोल-डिझेलचे दर सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत. देशातील अनेक भागांत इंधन टंचाईची समस्या निर्माण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी नागरिकांना वाहनांचा वापर आवश्यक असेल तेव्हाच करण्याचे आवाहन केले आहे. या संदर्भात बोलताना सौ. सिरसुल म्हणाल्या की, अहिल्यानगरहून पुण्याकडे दररोज हजारो प्रवासी खासगी वाहन, बस आणि इतर साधनांद्वारे प्रवास करतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पेट्रोल व डिझेलचा वापर होत असून त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवरही विपरीत परिणाम होत आहे. ही परिस्थिती टाळण्यासाठी अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी रेल्वे हा सर्वात परिणामकारक आणि पर्यावरणपूरक पर्याय ठरू शकतो.

पुणे-लोणावळा, पुणे-दौंड, पुणे-बारामती आणि पुणे-सोलापूर या मार्गांवर नियमित शटल रेल्वे सेवा सुरू असताना नगर-पुणे मार्गाला अपवाद का ठेवण्यात आला आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. नगर-पुणे रेल्वे अद्याप सुरू का झाली नाही, याबाबत रेल्वे प्रशासन किंवा मध्य रेल्वेच्या जनसंपर्क विभागाने कोणताही अधिकृत खुलासा केलेला नसल्याने नगरकर संभ्रमात असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे नागरिकांमध्ये रेल्वे प्रशासनाबाबत नाराजी वाढत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, व्यापारी आणि नोकरदार वर्ग यांची गरज लक्षात घेऊन दररोज सकाळी ७ वाजता अहिल्यानगरहून सुटणारी आणि सायंकाळी ६ वाजता पुण्याहून नगरकडे परतणारी इंटरसिटी रेल्वे सुरू करावी, अशी सूचनाही त्यांनी केली. या वेळापत्रकामुळे नगरचे प्रवासी सकाळी पुण्यात वेळेत पोहोचून दिवसभराची कामे पूर्ण करून रात्रीपर्यंत पुन्हा नगरला परतू शकतील. या रेल्वेला मोठ्या प्रमाणात प्रवाशांचा प्रतिसाद मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

देशहित, पर्यावरण संरक्षण आणि इंधन बचत या तिन्ही दृष्टीने अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी रेल्वे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत पंतप्रधानांच्या आवाहनाची रेल्वे बोर्ड आणि रेल्वे प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी व युद्धपातळीवर प्रयत्न करून ही रेल्वे सेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी सौ. स्वाती सिरसुल यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केली आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## जगाला प्रेम अर्पावे

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स

कुणीतरी भेटतो. मी लगेच त्यांच्याबद्दल मन बनवतो. त्याला माझा मापदंड लावतो. त्या मापदंडाला इतर कोण प्रमाण मानतो ? तो मापदंड सर्वस्वीकृत असतो? मी कुठं त्या फंदात पडतो? मी मत बनवलंय. तेव्हा तो सर्वोत्तमच म्हणवतो. मग लगेच त्या भेटलेल्याला चांगला किंवा वाईट ठरवतो. त्यानुसार तो त्याला वागवतो. हे असे बरोबर वागतो. मी स्वतःला असा कोण समजतो आणि मी भेटणाऱ्या प्रत्येकालाच असं काय देऊ शकतो ? पैसा, मान प्रतिष्ठा या तर माझ्याजवळ कामापुरत्यादेखील नसतात. त्यासाठी मला यातना होत असतात. अरे माणसा, तुझ्याजवळ प्रचंड साठा आहे एका गोष्टीचा. तो कधी न संपणारा आहे. प्रेमाचा सहृदयतेचा, सद्भावनाचा? का नाही वाटत तो, जो जो भेटेल त्याला ?




किती थोडे असतात असे सुजन ? अगदी अमृतासारखे त्यांचे मन. उत्साह देणारे वचन जगाच्या भल्यासाठी झिजणारे तन ते सतत दुसऱ्यांना मदत करीत असतात. इतरांना सुखवीत सुटतात. असा असतो तो सुजन भला. मनातून सदैव आनंदाने बहरलेला. अरे माणसा, तुला काय रे झाले तसे न व्हायला ? तसे न वागायला?

दुष्ट असो वा सुष्ट, त्याचे कधी चिंतू नये अनिष्ट, उलट त्याचे दूर सारावे अरिष्ट. लागट बोल सोसावे. प्रेमळ नम्र बोल बोलावे. सगळे सुखावतील असे वागावे.

एका अमेरिकन जेलरची कहाणी आहे. त्याच्या तुरुंगात बहुतेकांना जन्मठेपेची शिक्षा झालेली. पण त्या जेलरची सर्वांवर एकसारखीच प्रीती. एकदा एका अशाच कैद्याची आई खूप आजारी असल्याचे कळले. त्या कैद्याची आईवर खूप भक्ती. पण कैद्यावर अंधार कोठडीतच सडण्याची सक्ती, जेलरने त्याला तुरुंगाबाहेर सोडले. दोन दिवस उलटले. जेलरच्या पत्नीने चिडून संतापून जेलरला पुन्हा पुन्हा म्हटले, हे काय केले? तो नाही परतायचा. तुमचा जीव संकटात सापडायचा. जेलर शांत होता. तिसरा व चौथाही दिवस मावळला. कैदी मात्र परतला नाही.

पण पाचव्या दिवशी कैदी परतला. चार दिवसात बाहेरच्या लोकांचे वागणे, कावळ्यासारखे टोचणे त्याला असह्य झाले मनात त्या प्रेमळ जेलरचे विचारच घोळू लागले. तो म्हणाला जेलरला, मला बाहेर सतत वाटायचं की जेलरसाहेब चिंतेत असतील, मी नाही परतलो तर? सालातले तीन दिवस तरी दुःखविरहित जावेत म्हणून आईला सांगून परतलो. एकपट प्रेम दिले, दुप्पट परत मिळाले. **– किशोर गांधी**

# विश्वकल्याणासाठी नगरमध्ये ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयाग वेदघोष, मंत्रोच्चार आणि पूर्णाहुती

## अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाच्या उपक्रमाने अधिक मासात निर्माण झाला अध्यात्मिक उत्साह; हजारो भाविकांची उपस्थिती

नगर – जगभरात निर्माण झालेल्या अस्थिरता, संकटे आणि नकारात्मकतेचे निवारण होऊन विश्वात शांतता, समृद्धी आणि मंगलमय वातावरण निर्माण व्हावे या उदात्त हेतूने चितळे रोड येथील ऋग्वेद भवनात अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयागाची अत्यंत भक्तिमय वातावरणात पूर्णाहुती करून सांगता करण्यात आली. अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघ संचलित महर्षी वेद विद्यालयाच्या वतीने आयोजित या वैदिक सोहळ्याने संपूर्ण परिसर अध्यात्मिक उर्जेने भारावून गेला होता.

यागाच्या कालावधीत दररोज पहाटेपासून वेदघोष, मंत्रोच्चार, हवन, पूजन आणि विविध वैदिक विधींनी ऋग्वेद भवन परिसरात भक्तिरसाचा दरवळ निर्माण केला होता. वैदिक परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला भाविकांचा प्रतिसाद लाभला.

अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाचे उपाध्यक्ष राजकुमार जोशी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली या धार्मिक सोहळ्याची सुरुवात झाली. यजमान प्रसाद कडेकर व अशोक कुलकर्णी सपत्नीक यांच्या हस्ते अग्नी प्रदीपन करून ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयागास प्रारंभ करण्यात आला.

यानंतर प्रायश्चित्त विधी, श्रीगणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन,


अधिक मासानिमित्त आयोजित ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयागाच्या सांगता प्रसंगी यजमान चंद्रचूड गोंगले, अशोक कुलकर्णी, राजेंद्र भणगे, अ‍ॅड. शिरीष गटणे, अनिलकुमार जोशी, निनाद देव, अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष किशोर जोशी, उपाध्यक्ष राजकुमार जोशी, ब्रह्मवृंद उपस्थित होते. (छाया – उदय जोशी)

नांदीश्राद्ध, योगिनी मंडल पूजन, वर्धिनी कलश पूजन, भैरव मंडल, रुद्र मंडल तसेच नवग्रह पूजन यांसारखे विविध वैदिक विधी अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने पार पडले. वेदमंत्रांच्या निनादाने परिसर दुमदुमून गेला होता.

यजमान चंद्रचूड गोंगले, अशोक कुलकर्णी, राजेंद्र भणगे, अ‍ॅड. शिरीष गटणे, अनिलकुमार जोशी, निनाद देव यांच्या हस्ते ऋग्वेद हवन, स्थापित देवता हवन, बलिदान, पूर्णाहुती व महाआरती करण्यात आली. विशेष म्हणजे दररोज पाच यजमानांच्या हस्ते ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयाग संपन्न होत होता. या धार्मिक विधीमध्ये सहभागी होण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

या प्रसंगी संघाचे अध्यक्ष किशोर जोशी, मयूर जोशी, अमोल कापरे, प्रसाद कुलकर्णी, सागर गोवर्धन, अवधूत भणगे, श्रीकांत जोशी, ओम जोशी, गणेश भालेराव, प्रदिप जोशी, घनपाठी प्रतिक मुळे, आनंद जोशी यांच्यासह ब्रह्मवृंद उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीत वातावरण अधिक भक्तिमय आणि उत्साहपूर्ण झाले होते.

पूर्णाहुतीनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजकुमार जोशी यांनी अथक परिश्रम घेतले. तसेच बन्सीमहाराज मिठाईचे संचालक राजकुमार जोशी परिवाराच्या वतीने दररोज अन्नदानाची सेवा करण्यात आली. या सेवाकार्याबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त केले.

अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या वैदिक सोहळ्यामुळे अहिल्यानगर शहरात धार्मिक आणि अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून वैदिक संस्कृतीचा जागरही प्रभावीपणे दिसून आला.

# पोस्टल संघटनेच्या कार्याध्यक्षपदी संतोष यादव यांची फेरनिवड

## धनंजय राऊत सर्कल सचिव, महादेव गोपाळघरे खजिनदारपदी, रायते कल्याण येथे २७ वे राज्य अधिवेशन उत्साहात

नगर – नॅशनल असोसिएशन ऑफ पोस्टल एम्प्लॉईज ग्रुप 'सी' महाराष्ट्र व गोवा सर्कलचे २७ वे द्विवार्षिक अधिवेशन २० ते २२ मे दरम्यान रायते (ता. कल्याण) येथील आदित्य अ‍ॅग्रो फार्म अ‍ॅण्ड रिसॉर्ट येथे उत्साहात झाले. या अधिवेशनात अहिल्यानगर कॅम्प पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर व पोस्टल संघटनेचे संतोष यादव यांची महाराष्ट्र सर्कलच्या कार्याध्यक्षपदी बिनविरोध फेरनिवड करण्यात आली. तसेच जामखेड तालुक्यातील रहिवासी व मुंबई नॉर्थ ईस्ट विभागात कार्यरत असणारे महादेव गोपाळघरे यांची खजिनदारपदी निवड झाली.



अधिवेशनाचे उद्घाटन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील झुंजारराव (दिल्ली), सेक्रेटरी जनरल शिवाजी वासू रेड्डी (दिल्ली), जनरल सेक्रेटरी निसार मुजावर (दिल्ली) तसेच संतोष लाड (मुंबई) यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. राज्यभरातील सुमारे चाळीस विभागांतील दीडशेहून अधिक प्रतिनिधींनी अधिवेशनात सहभाग घेतला होता

प्रतिनिधी सत्रात महाराष्ट्र व गोवा राज्यातील विविध विभागांतील प्रतिनिधींनी आपल्या विभागातील प्रश्न, कर्मचारी हिताशी संबंधित विषय मांडले. डाक विभागाची सद्यस्थिती, नवीन सॉफ्टवेअर प्रणाली, आठवा वेतन आयोग, तसेच दिल्लीस्तरीय संघटनात्मक घडामोडी यावर सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी राष्ट्रीय नेते निसार मुजावर, सुनील झुंजारराव आणि शिवाजी वासू रेड्डी यांनी मार्गदर्शन करताना कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी संघटना कटिबद्ध असल्याचे सांगितले. येणाऱ्या आठव्या वेतन आयोगाच्या पार्श्वभूमीवर संघटनेने आयोगाच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले असून त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याची माहितीही त्यांनी दिली.

अधिवेशनात पुढील दोन वर्षांसाठी राज्य कार्यकारिणीची निवड करण्यात आली. कार्यकारिणी पुढीलप्रमाणे अध्यक्ष आशुतोष देशपांडे (नाशिक), कार्याध्यक्ष संतोष यादव (अहिल्यानगर), उपाध्यक्ष शिवाजी नवले (बीड), सर्कल सचिव धनंजय राऊत (नागपूर) तसेच खजिनदार महादेव गोपाळघरे (मुंबई नॉर्थ ईस्ट), उपसचिव योगेश समडोलीकर (कोल्हापूर), सहायक मंडळ सचिव श्रीमती शुभदा घाग (मुंबई ईस्ट), चंद्रकांत चांदरे (पुणे वेस्ट), रवी भोसले (छत्रपती संभाजीनगर), कालूराम पारखी (पुणे ईस्ट), सूर्यकांत गुट्टे (लातूर), धनंजय इंगोले (नवी मुंबई), शंतून सोनार (मालेगाव) व एफ. आर. तडवी (भुसावळ), सहायक खजिनदार सुनील गोवर (गोवा) तर ऑडिटर म्हणून लखन वैष्णव (छत्रपती संभाजीनगर) यांची निवड झाली.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा अधिवेशनस्थळी सत्कार करण्यात आला. अधिवेशनात कमलेश मिरगणे, रावसाहेब चौधरी (अहिल्यानगर), प्रकाश कदम, संतोष रायकर (बारामती), राजेंद्र विश्वास, शैलेश शिलवंत, पांडुरंग खेडकर (श्रीरामपूर), आर. एच. गुप्ता, हरी घुले (मुंबई), धनंजय शेंडगे, किरण सावंत (बीड), शिवाजी तोंडले, उदय बंडगर (पंढरपूर), अनिल थोरात (सोलापूर), गणेश ठाकूर (धुळे), मन्मथ राऊत, मिलिंद निपाणकर (नागपूर), सोपान महाडिक (रायगड), सदा नाईक (नवी मुंबई), चेतन आपेट (नाशिक) यांचे सह राज्यभरातील चाळीस विभागातील दिडशे प्रतिनिधी उपस्थित होते.

अधिवेशनाचे प्रमुख संयोजक संतोष कदम (ठाणे) यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण टीमने प्रतिनिधींसाठी उत्कृष्ट व्यवस्था केली होती. प्रास्ताविक संतोष कदम यांनी केले. सूत्रसंचालन रुपेश नगरकर यांनी तर आभार प्रदर्शन संदीप सैदानी यांनी केले.

# घरगणनेच्या कामास उत्साहात प्रारंभ

नगर – जनगणनेचा पहिला टप्पा असलेल्या घरगणनेच्या कामास जिल्हाभरात उत्साहात प्रारंभ झाला आहे. शहर व ग्रामीण भागातील प्रत्येक गावामध्ये जनगणनेसाठी नेमलेले प्रगनक व पर्यवेक्षक घरोघरी भेटी देत आहेत घरांना नंबर देत आहेत प्रकरणात गटाचे नकाशे देखील तयार करण्यात आले आहेत त्यानुसार प्रत्येक घराला भेट देऊन घरांची माहिती घेतली जात आहे. सध्या उन्हाच्या तडाका सुरू असल्याने बहुतांश प्रकरणात सकाळी सात वाजताच आपापल्या प्रभागामध्ये जाऊन घर गणनेचे कार्य करीत आहेत. नागरिकांकडूनही त्यांना चांगला प्रतिसाद दिला जात असल्याचे काही प्रगणकांनी सांगितले.


घरगणनेचे काम करताना प्राथमिक शिक्षिका सुजाता पुरी.

प्रत्येक प्रकरणाला जनगणना कीट देण्यात आले असून यामध्ये उन्हापासून बचाव करण्यासाठी कॅप तसेच एक बॅग असून त्यामध्ये आवश्यक साहित्य आहे. परमनंट मार्कर पेन द्वारे प्रत्येक घराच्या दारावर नंबर टाकला जात आहे सदरचा नंबर जनगणना पूर्ण होईपर्यंत सुरक्षित ठेवण्याचे आवाहन देखील घर मालकांना करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातून संपूर्ण जिल्ह्यातील जनगणना कामकाजावर नियंत्रण ठेवले जात आहेत ज्या प्रगनकांनी काम सुरू केलेले नाही त्यांना संबंधित तालुक्यातील तहसीलदारांमार्फत सूचना देण्यात आले आहेत. अद्यापपर्यंत आणि जनगणनेबाबत कोणते स्वरूपाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

नागरिकांचे उत्तम सहकार्य मिळत आहे. उन्हामुळे सकाळीसात वाजता कामाला सुरुवात करून साडे दहा ते अकरा वाजेपर्यंत काम करीत आहे. नकाशा तयार झाला असून घरांना नंबर देखील देऊन झाले आहेत. जनगणनेसाठी उपलब्ध करून दिलेल्या अ‍ॅप मध्ये घरातील कुटुंबाची माहिती भरली जात आहे. पहिल्या टप्प्यात घर गणना केली जात आहे, असे पिंपळगाव माळवीच्या प्राथमिक शिक्षिका सुजाता पुरी यांनी सांगितले.


सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या संचालिका सौ. प्रिती बोगावत यांना पतसंस्थेच्या सभागृहात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# 'सुवालालजी गुंदेचा पतसंस्थे'च्या वाटचालीत स्व. प्रिती बोगावत यांचे महत्वपूर्ण योगदान

## चेअरमन अभय पितळे यांचे प्रतिपाद; जैन ओसवाल पतसंस्थेच्या संचालिका यांना भावपूर्ण श्रद्धांजली

नगर – सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या विद्यमान संचालिका सौ. प्रिती प्रतिक बोगावत यांचे नुकतेच आकस्मिक निधन झाले. त्यांना पतसंस्थेच्या सभागृहात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी चेअरमन अभय पितळे, व्हाईस चेअरमन शैलेश गांधी, संचालक संतोष गांधी, विनित बोरा, अ‍ॅड. आनंद फिरोदिया, शरद गोयल, ज्येष्ठ तज्ज्ञ संचालक शांतीलाल गुगळे, सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी, माजी चेअरमन शैलेश मुनोत (बबलू), प्रतिक बोगावत, नितीन सोनी, नितीन मुनोत, प्रमोद डागा, प्रणिल बोगावत, प्रणव बोगावत, भिंगारचे शैलेश मुनोत, मनोज मुनोत व कर्मचारी उपस्थित होते.

चेअरमन अभय पितळे म्हणाले, जैन ओसवाल पतसंस्थेच्या वाटचालीत महिला संचालकांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. प्रिती बोगावत यांचे आकस्मिक निधन धक्कादायक आहे. संचालकपदी काम करताना त्यांनी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी नेहमीच मौलिक सूचना केल्या. महिला सभासदांसाठी चांगल्या योजना राबविण्यासाठी त्या आग्रही असायच्या. सहकाराचा त्यांनी अल्पावधीतच चांगला अभ्यास केला होता. पतसंस्थेच्या कामकाजात त्यांची उणीव नेहमीच जाणवत राहील. बोगावत परिवाराला परमेश्वर या दु:खातून सावरण्याची शक्ती प्रदान करो.

यावेळी संतोष गांधी, शैलेश गांधी, शैलेश मुनोत यांनीही बोगावत यांच्या आठवणींना उजाळा देत श्रद्धांजली अर्पण केली.

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा बालरंगभूमी पुरस्कार अहिल्यानगर येथील रंगकर्मी डॉ.सुधा कांकरिया यांना जाहीर

नगर – अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद संस्थेकडून बालरंगभूमी क्षेत्रात उल्लेखनीय व विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींना दिला जाणारा पुरस्कार यंदा अहिल्यानगर ज्येष्ठ साहित्यिक, समाजसेविका व रंगकर्मी डॉ. सुधा कांकरिया यांना जाहीर करण्यात आला. दरवर्षी १४ जून रोजी ही पुरस्कार दिले जातात.



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद संस्थेकडून बालरंगभूमी क्षेत्रात उल्लेखनीय व विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींना दिला जाणारा पुरस्कार अहिल्यानगर डॉ. सुधा कांकरिया यांना जाहीर झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना प्रसाद बेडेकर आदी.

राज्यस्तरीय कांकरिया करंडक बाल एकांकिका स्पर्धा या माध्यमातून मुलांमध्ये संस्कार, सर्जनशीलता, कलात्मकता आणि सामाजिक भान रुजविण्यासाठी डॉ. सुधा कांकरिया यांनी २५ वर्षे केलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी असून, त्यांच्या या योगदानाचा गौरव म्हणून हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे अशी माहिती नाट्यपरिषद मध्यवर्तीचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी दिली. त्यांच्या कार्यामुळे बाल कलाकारांना नवे आयाम लाभले असून अनेक बालकलाकारांना योग्य व्यासपीठ मिळाले आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद अहिल्यानगर उपनगर शाखा यांच्यावतीने डॉ. सुधा कांकरिया यांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता आणि त्याला मध्यवर्ती शाखेने तत्काळ मान्यता दिली आणि हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. या निमित्ताने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी डॉ. प्रकाश कांकरिया अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद अहिल्यानगर उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद बेडेकर, अमोल खोले, कार्याध्यक्ष पी.डी. कुलकर्णी, सहकोषाध्यक्ष शिरीष जोशी, उपाध्यक्ष प्रशांत जठार, शैलेश देशमुख, सौ.स्नेहा रानडे, जयंत येलुलकर आदी उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# ‘रिल’मध्ये दिसणारं घर आणि प्रत्यक्षात जगायचं घर यात खूप फरक असतो






Reel मध्ये दिसणारं घर आणि प्रत्यक्षात जगायचं घर यात खूप फरक असतो!

आजकाल घर बांधण्यापूर्वी नकाशा कमी आणि Pinterest Board जास्त तयार होतं.

Instagram Reels, YouTube Home Tours आणि Social Media Trends यांनी Interior Design ची संपूर्ण व्याख्याच बदलून टाकली आहे. एका क्लिकवर हजारो Luxury Homes दिसतात. Warm Lighting, Wooden Textures, Minimal Interiors, Aesthetic Corners, Imported Furniture आणि नकळत प्रत्येकाच्या मनात एकच इच्छा निर्माण होते, माझं घरही असंच दिसलं पाहिजे! पण इथेच एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो – आपण घर Design करतोय की फक्त फोटो? कारण Camera ला सुंदर दिसणारं प्रत्येक घर मनाला शांत वाटेलच असं नाही. आज अनेक घरं Social Media वर Perfect दिसतात. पण प्रत्यक्षात तिथे मोकळेपणा नसतो, नैसर्गिक प्रकाश नसतो, योग्य ventilation नसतं आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे घरपण नसतं. Interior Design ही फक्त सजावटीची गोष्ट नाही. ती रोजच्या जीवनाचा अनुभव घडवणारी प्रक्रिया आहे. अहिल्यानगरमध्येही आज हा बदल स्पष्ट दिसतोय. लोक आता Cement, Tiles आणि Furniture आधी Reference Images निवडतात. हा Instagram Look हवा, Pinterest सारखी Kitchen पाहिजे, Reel-worthy Bedroom पाहिजे पण खरं Interior ते नसतं, जे फक्त Social Media वर Viral होतं.

खरं Interior ते – जे रोजच्या आयुष्यात तुमचं जीवन सोपं करतं. कारण –

- ✻ सुंदर Sofa पेक्षा आराम महत्त्वाचा असतो.
- ✻ Fancy Lighting पेक्षा योग्य प्रकाश महत्त्वाचा असतो.
- ✻ महागड्या Decor पेक्षा मोकळी जागा महत्त्वाची असते.
- ✻ Trendy Design पेक्षा Peaceful Feeling जास्त महत्त्वाची असते.

आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस बाहेरच्या जगाशी सतत लढतोय.

Traffic, Stress, Mobile Notifications, Social Pressure

अशा वेळी त्याचं घर हे फक्त Address राहत नाही तर ते त्याचं Emotional Recharge Station बनतं. आणि म्हणूनच आज Interior Design मध्ये Positive Energy या संकल्पनेला प्रचंड महत्त्व प्राप्त झालं आहे.

वास्तुशास्त्राचा खरा अर्थ फक्त दिशा नाही.

तो आहे – Space मधील संतुलन समजून घेणं.

योग्य सूर्यप्रकाश, नैसर्गिक हवा, स्वच्छ circulation, clutter-free planning आणि संतुलित layout -

या गोष्टी घरात शांतता निर्माण करतात. आज लोक False Ceiling वर लाखो रुपये खर्च करतात पण घरात सकाळचा प्रकाश येतो का?. कुटुंब एकत्र बसण्यासाठी जागा आहे का?, घरात प्रवेश करताच शांत वाटतं का? हे प्रश्न खूप कमी लोक विचारतात.

कारण –

Luxury दिसते, पण Energy जाणवते. आजचा ग्राहक Stylish Space पेक्षा Meaningful Space शोधतोय. Minimalism आज फक्त Trend राहिलेला नाही, ती मानसिक गरज बनत चालली आहे. लोक आता कमी वस्तूंमध्ये जास्त शांतता शोधत आहेत. Soft Colours, Natural Materials, Indoor Plants, Open Spaces आणि Warm Lighting यांना मोठी पसंती मिळतेय. कारण आता लोकांना Impress करण्यापेक्षा Peacefully जगायचं आहे. Social Media ने लोकांना Design शिकवलं, पण Interior चा आत्मा अजूनही अनुभवातूनच समजतो. आज प्रत्येक घर Instagram-worthy दिसू शकतं, पण प्रत्येक घर मनाला आवडेल असं नसतं. आणि म्हणूनच आजचा Interior Designer हा फक्त Decorator राहिलेला नाही.

तो आता Lifestyle Creator, Energy Planner आणि Human Behaviour समजणारा Space Designer बनत चालला आहे.

कारण शेवटी सुंदर घर Camera ला आवडतं पण संतुलित घर मनाला जिवंत ठेवतं आणि म्हणून Likes काही सेकंद टिकतात पण योग्य Interior रोज जगावं लागतं.



Reflection interiors
Pravin Kisanrao Padwal.
padwalpravin339@gmail.com
Cell : 9309083815.
Vipasha Apartment ,
A-4 , Sawedi, Ahilyanagar.
Bhaghyshri Society,
C-3, Raikernager, Dhayri,
Sinhagad Road , Pune 41.

AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

## आंतरराष्ट्रीय संगीत परिक्षेत ग्रेस म्युझिक ॲकॅडमीचे यश

नगर – लंडन येथील ट्रीनिटी कॉलेजच्या वतीने घेण्यात आलेल्या संगीत परिक्षेत अहिल्यानगर मधील ’ग्रेस म्युझिक ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

जोएल मनिष लोखंडे, चैतन्य राजेंद्र गंधे इलेक्ट्रॉनिक कि–बोर्ड ग्रेड–१, प्रक्टिकल एंजेलो राकेश थोरात, अँरन पिटर पंडीत प्लॅकट्रम गिटार ग्रेड–१ प्रॅक्टिकल, जोएल महेंद्रा साठे प्लॅकदम गिटार इनिशियल ग्रेड प्रक्टिकल, मयुरेश ललित भुमकर, अनन्या मार्शल कोळगे, विधी रोहीत म्हस्के, शोर्य संतोष राठोड इलेक्ट्रॉनिक कि–बोर्ड, इनिशियल ग्रेड प्रॉट्रिकल, शौर्य संतोष राठोड, इरा अमित बडवे, मुहती गोपाळ बहरूपी इमसेट इनिशियन ग्रेड प्रक्टिकल या परिक्षेत गुणवत्तापुर्वक यश संपादन केले.

ग्रेस म्युझिक अक्ॅडमी अहिल्यानगर जिल्हयातील एकमेव संगीत ॲकॅडमी आहे ज्याद्वारे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय संगीत परिक्षेत सहभागी होता येते असे पिटर पंडीत, सौ.सोनाली पंडीत यांनी सांगितले. या परिक्षेत सहभागी होण्यासाठी ९५११२२४७९४ / ९८९०९७८९९७ या नंबर वर संपर्क करावा.

# युवकांनी व्यवसाय क्षेत्रात पुढे यावे : आ.संग्राम जगताप

### बोल्हेगाव फाटा येथे ‘माऊली बाईक होलसेलर’ दालनाचा शुभारंभ




जुन्या मोटरसायकल खरेदी–विक्री क्षेत्रातील ‘माऊली बाईक होलसेलर’ या दालनाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप आणि आमदार अक्षय कर्डिले यांच्या उपस्थितीत झाले. (छाया – लहू दळवी)

नगर – युवकांनी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीसोबत व्यवसाय क्षेत्राकडेही वळले पाहिजे. जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर व्यवसायामध्ये मोठे यश मिळवता येते. माऊली बाईकने जुन्या गाड्यांच्या विक्री क्षेत्रात ग्राहकांचा विश्वास संपादन केला असून हे दालनही ग्राहकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की, स्थानिक पातळीवर नवीन व्यवसाय सुरू झाल्यास रोजगाराच्या संधी निर्माण होतात आणि शहराच्या अर्थव्यवस्थेलाही चालना मिळते. युवकांनी आधुनिक व्यवसाय संकल्पना स्वीकारून स्वतःच्या पायावर उभे राहणे गरजेचे आहे.

जुन्या मोटरसायकल खरेदी–विक्री क्षेत्रातील ‘माऊली बाईक होलसेलर’ या दालनाची नवीन शाखा बोल्हेगाव फाटा येथे सुरू करण्यात आली. जुन्या दुचाकींचा मोठा स्टॉक, विविध कंपन्यांच्या गाड्या आणि सुलभ कर्ज सुविधा यामुळे या दालनाकडे ग्राहकांचे आकर्षण वाढत आहे. या दालनाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप आणि आमदार अक्षय कर्डिले यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी नगरसेवक कुमारसिंग वाकळे, प्रशांत वारे, आकाश कातोरे, बाबासाहेब नागरगोजे, राजेश कातोरे, संपत बारस्कर, संतोष शिंदे, करण गायकर, शिवा तेलंग आदींसह नागरिक उपस्थित होते. तसेच सोमनाथ बेरड, दत्तात्रय बेरड, गणेश जाधव, संतोष मोकाटे, शुभम खुळे, अमोल आत्रे, अभय धूस, अरुण भोर, पप्पू वाकळे आदी उपस्थित होते.

माऊली बाईकचे संचालक दिनेश जाधव यांनी सांगितले की, अहिल्यानगरमधील ही आमची सातवी शाखा असून ग्राहकांसाठी प्रत्येक प्रकारची लोन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अवघ्या पाच ते दहा हजार रुपयांच्या डाउन पेमेंटवर विविध दुचाकी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. ग्राहकांना विश्वासार्ह सेवा, दर्जेदार गाड्या आणि सुलभ व्यवहार देण्याचा आमचा प्रयत्न राहील.




महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या वतीने आयोजित ‘अमृतपेठ – थेट बाजारपेठ’ या उपक्रमाचे उद्घाटन करताना अमृत संस्थेचे राज्य प्रमुख दीपक जोशी. यावेळी मंगेश खाडिलकर, नगरसेवक ऋग्वेद गंधे, सुरेश क्षीरसागर, गीता गिल्डा आदी.

# ‘अमृतपेठ – थेट बाजारपेठ’चे अहिल्यानगरमध्ये उद्घाटन

### स्वदेशी उत्पादनांना नवी दिशा देणारा उपक्रम सुरू

नगर – स्थानिक उत्पादकांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवून स्वदेशी व दर्जेदार उत्पादनांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या वतीने आयोजित ‘अमृतपेठ – थेट बाजारपेठ’ या उपक्रमाचे उद्घाटन २३ मे ऋग्वेद भवन हॉल, चितळे रोड येथे उत्साहात पार पडले. अमृत संस्थेचे राज्य प्रमुख दीपक जोशी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी अमृत चे मंगेश खाडिलकर, नगरसेवक ऋग्वेद गंधे, सुरेश क्षीरसागर, गीता गिल्डा, प्रिया जानवे, संध्या पावसे, संध्या पावसे उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी दीपक जोशी म्हणाले, अमृतपेठ हा केवळ बाजारपेठ नसून स्थानिक उत्पादक, महिला बचत गट आणि लघुउद्योजकांना थेट व्यासपीठ देणारी चळवळ आहे. ग्राहकांना दर्जेदार व विश्वासार्ह स्वदेशी उत्पादने मिळावीत आणि उत्पादकांचे आर्थिक सक्षमीकरण व्हावे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

नगरसेवक ऋग्वेद महेंद्र गंधे यांनी सांगितले, अहिल्यानगरसारख्या शहरात अशा उपक्रमांची अत्यंत गरज आहे. स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन मिळाल्यास रोजगारनिर्मिती वाढते आणि स्वदेशी उद्योग अधिक मजबूत होतो. नागरिकांनी या उपक्रमाला प्रतिसाद द्यावा.

मार्च महिन्यात मिळालेल्या यशस्वी प्रतिसादानंतर पुन्हा एकदा २३ व २४ मे रोजी ही अमृतपेठ अहिल्यानगरकरांसाठी खुली करण्यात आली आहे. या बाजारपेठेत महिला बचत गट व लघुउद्योजकांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांचे आकर्षक स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. यामध्ये नाचणी व शेंगदाणा लाडू, चकली, लोणचे, मसाले, पापड, खाकरा, बाकरवडी यांसारखे पारंपरिक खाद्यपदार्थ, तसेच हॅन्डमेड ज्वेलरी, मोती व अमेरिकन डायमंड दागिने, साड्या, कुर्तीज, बॅग्स, देववस्त्रे, हस्तकला उत्पादने यांचा समावेश आहे.

याशिवाय आयुर्वेदिक सौंदर्य उत्पादने, अगरबत्ती, परफ्युम, स्किन व हेअर केअर उत्पादने, सोलर पॅनल, वॉटरप्रूफिंग साहित्य आणि विविध उपयोगी वस्तूंचे स्टॉल्सही नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. विशेष म्हणजे शासकीय योजनांची माहिती व नोंदणीसाठी स्वतंत्र स्टॉलही येथे उपलब्ध करून देण्यात आला आहे.

दर्जेदार, स्वदेशी व थेट उत्पादकांकडून खरेदीचा अनुभव घेण्यासाठी नागरिकांनी कुटुंबासह अमृतपेठेला अवश्य भेट द्यावी, असे आवाहन अमृत संस्थेचे अहिल्यानगर जिल्हा व्यवस्थापक सागर भोपे यांनी केले आहे.

यासाठी अमृत मित्र वैभव कुलकर्णी, शरद क्षीरसागर, संदीप देशपांडे, वृषाली भोपे, गौरी कुलकर्णी व सुजल झुंजारे यांनी मेहनत घेतली.

# आठरे पाटील पब्लिक स्कूलच्या अत्याधुनिक जलतरणास प्रतिसाद



आठरे पाटील पब्लिक स्कूलच्या अत्याधुनिक जलतरणास नगरकरांचा प्रतिसाद लाभत आहे.

नगर – शहराच्या सावेडी भागातील वडगांव–गुप्ता रोडवरील, आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेचा अद्ययावत जलतरण तलाव विद्यार्थ्यांसाठी तयार केलेला असून पश्चिम महाराष्ट्रातील फ्रेंच तंत्रज्ञानावर आधारित हा एकमेव जलतरण तलाव आहे. जलतरण तलावासह शॉवर रुम, बाथरुम, लाईफगार्ड, चेंजिग रुम मुलां– मुलींसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध आहेत. देज वायो पूल्स या फ्रेंच कंपनीने या जलतरण तलावाची उभारणी केलेली असून, त्यात तीन स्वयंचलित फिल्टर मशिन्स बसविण्यात आलेल्या आहेत. असा जलतरण तलाव सर्वांसाठी १ एप्रिल पासून खुला केलेला असून या तलावात ४ वर्षाच्या लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांनी उन्हामुळे गर्दी केलेली आहे. तसेच लहान मुलेही उत्तम जलतरणाचे प्रशिक्षण घेऊन स्वच्छ पाण्याचा आनंद घेत आहेत.

जलशुद्धीकरणासाठी निरुपद्रवी अशी रसायने फ्रांस देशातून मागविली जातात, या रसायनांमुळे मानवी त्वचेला कोणताही अपाय होत नाही. जलतरण तलावात जलशुद्धीकरणासाठी विशेष यंत्रसामग्री बसविण्यात आली आहे. पाण्यातील क्लोरीनचे प्रमाण आणि पी. एच. ची गुणवत्ता दररोज तपासली जाते. जलतरण तलावातील पाणी एकदम शुद्ध, स्वच्छ आणि पारदर्शक असते. जलतरण तलावाच्या पाण्यात कधीही शेवाळ होत नाही.

जलतरणाचे शारीरिक फायदे असे की, जलतरणाने शारीरिक शक्ती आणि क्षमतांचा विकास होतो. रोग प्रतिकारक शक्तीमध्ये वाढ होऊन, मानसिक कणखरता विकसित होते. जलतरणाने संपूर्ण शरीराला व्यायाम मिळतो. कुशल, अनुभवी अशा जलतरण प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली सदर जलतरणाच्या प्रशिक्षणात जास्तीत जास्त मुले व नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अंजली आठरे पाटील व कार्यकारी विश्वस्त डॉ. अनिल आठरे पाटील यांनी केले आहे.

## आर्किटेक्चरच्या (वास्तुकला) प्रवेशासाठी शेवटची संधी



नगर – देशभरातील वास्तुकला(Architecture) महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेली नॅशनल ॲप्टिट्यूड टेस्ट इन आर्किटेक्चर (NATA) २०२६ परीक्षेची प्रक्रिया एप्रिल २०२६ सुरु झालेली आहे. कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर (COA) न्यू दिल्ली द्वारे आयोजित केली जाणारी ही परीक्षा बी.आर्च (B.Arch) या पाच वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमासाठी अनिवार्य आहे.

वास्तुकला क्षेत्रातील करिअरसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी वाळूंज येथील ’रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्चर’ (Ramesh Phirodia College of Architecture) हे नामांकित महाविद्यालय आहे. जिल्ह्यातील अग्रगण्य संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या महाविद्यालयातून दर्जेदार आर्किटेक्ट घडत आहेत.

नाटा २०२६ ची नोंदणी प्रक्रिया एप्रिल २०२६ मध्येच सुरू झाली असून याची नोंदणी NATA २०२६ या अधिकृत वेबसाईट वर विद्यार्थ्यांनी करावी, पहिल्या फेजच्या NATA परीक्षा सुरु झाल्या असून त्या १३ जुन पर्यंतच्या प्रत्येक शुक्रवारी दुपारच्या सत्रांत आणि प्रत्येक शनिवारी दोन सत्रांत घेतली जाणार आहे. पहिल्या फेज मधे एक विद्यार्थी जास्तीत जास्त दोन वेळा ही परीक्षा देऊ शकतो.

परीक्षेची दुसरी फेज ७ व ८ ऑगस्ट रोजी असून जे विद्यार्थी पहिल्या फेज ला बसू शकले नाही त्यांनाच हि परीक्षा एकदाच देता येऊ शकणार आहे परंतु या विद्यार्थाना ॲडमिशन प्रक्रिया पूर्ण झाल्यावर रिक्त (NON-CAP) असलेल्या जागांसाठीच प्रवेश घेता येऊ शकेल अशी माहिती कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरच्या प्रसिद्धी पत्रकात देण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांनी NATA परीक्षेच्या अधिक माहितीसाठी https://nata.in या वेबसाईटला भेट द्या. NATA प्रवेश परीक्षेच्या अधिक माहितीसाठी आणि मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या ॲडमिशन सेलशी (Admission Cell) ८६०५०५३०२५ / ९८६०४९५४९४ क्रमांकावर संपर्क साधावा.

# सोलर सिस्टिम ही आता काळाची गरज : आ. संग्राम जगताप

### टिळक रोड येथे ‘रुद्र एंटरप्राइजेस सोलर सिस्टिम’ दालनाचे उद्घाटन



टिळक रोड येथे ‘रुद्र एंटरप्राइजेस सोलर सिस्टिम’ दालनाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. (छाया – लहू दळवी)

नगर – केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून सौरऊर्जे ला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबविल्या जात असून नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सोलर सिस्टिमचा स्वीकार करणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री सूर्योदय योजनेच्या माध्यमातून नागरिकांना आर्थिक मदत आणि अनुदान दिले जात आहे. त्यामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांनी सोलर शेती पंप, घरगुती वीज निर्मिती तसेच विविध सौरऊर्जा सुविधांकडे वळावे. सोलर सिस्टिम ही आता काळाची गरज बनली असून जास्तीत जास्त नागरिकांनी सौरऊर्जेचा वापर करून विजेची बचत करावी, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

टिळक रोड येथे ‘रुद्र एंटरप्राइजेस सोलर सिस्टिम’ दालनाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार अक्षय कर्डिले, नगरसेवक मनोज कोतकर, संभा पवार, दरेवाडीचे सरपंच अनिल करांडे, वाळकीचे सरपंच शरद बोठे, बाजार समितीचे माजी सभापती अभिलाष घिगे, स्वामी मोबाईलचे संदीप पडोळे, रंगनाथ निमसे, अनिल बोठे, संचालक राहुल घुसळे, सौरभ खेडकर आदींसह नागरिक उपस्थित होते.

आ. अक्षय कर्डिले म्हणाले की, देशामध्ये ऊर्जा बचत आणि पर्यावरण संरक्षणासाठी सौरऊर्जा अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. केंद्र शासनाने प्रधानमंत्री सूर्योदय योजना सुरू करून सामान्य नागरिकांपर्यंत सौरऊर्जेचा लाभ पोहोचवण्याचे काम केले आहे. आज अनेक शेतकरी सोलर शेती पंपाच्या माध्यमातून विजेवरील खर्च कमी करत आहेत. घरगुती सोलर प्रकल्पामुळे नागरिकांना दीर्घकालीन आर्थिक बचत होत आहे. भविष्यात पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून सौरऊर्जेकडे वळणे ही काळाची गरज आहे.

ते पुढे म्हणाले की, अहिल्यानगरसारख्या शहरांमध्ये सोलर सिस्टिम व्यवसायाला मोठी संधी आहे. स्थानिक स्तरावर अशा उद्योगांची उभारणी झाल्यास युवकांना रोजगार उपलब्ध होईल आणि नागरिकांना आधुनिक तंत्रज्ञानाची सुविधा आपल्या शहरातच मिळेल. पर्यावरणपूरक विकासासाठी सौरऊर्जा हा सर्वोत्तम पर्याय असून प्रत्येक घर आणि उद्योगांनी सोलरचा वापर वाढवावा.

रुद्र एंटरप्राइजेसचे संचालक राहुल घुसळे म्हणाले की, रुद्र एंटरप्राइजेस सोलर सिस्टिमच्या माध्यमातून ग्राहकांना विविध सौरऊर्जा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या माध्यमातून नागरिकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक बचत होणार आहे. सोलर वॉटर हीटर, सोलर स्ट्रीट लाईट, सोलर वॉटर पंप, सोलर इन्व्हर्टर यांसह विविध प्रकारच्या सोलर सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. दर्जेदार सेवा आणि योग्य मार्गदर्शन देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

# निरामय

## ४४ कोटींहून अधिक लठ्ठपणाच्या विळख्यात?

२०५० पर्यंत ४४ कोटींहून अधिक भारतीय लठ्ठपणाचे शिकार होऊ शकतात, अशी धक्कादायक माहिती एका अहवालातून उघड झाली असून यावर खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील चिंता व्यक्त केली आहे.

भारतीय नागरिकांमध्ये दिवसेंदिवस लठ्ठपणाची समस्या वाढत असल्यामुळे नागरिकांना विविध आजारांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळेच २०५० पर्यंत ४४ कोटींहून अधिक भारतीय लठ्ठपणाचे शिकार होणार असल्याचा धोका गांभीर्याने घ्यायला हवा. प्रत्येकाने सक्रिय आणि निरोगी जीवनशैली अंगीकारण्याचा सल्ला मोदी यांनी दिला आहे.

जाणून घ्या

**बदलत्या जीवनशैलीमुळे लठ्ठपणा**

खाण्यापिण्याच्या बदलत्या सवयी आणि बदलते जीवनमान यामुळे लठ्ठपणाची समस्या वाढत आहे. बदलती जीवनशैली शरीरासाठी घातक ठरत आहे. यातही युवा वर्ग अधिक प्रमाणात लठ्ठपणास बळी पडत आहे. लठ्ठपणामुळे अनेक आजारांना आमंत्रण मिळते. त्यामुळे वेळीच काळजी घेणे गरजेचे आहे. नियमित व्यायाम करणे शरीरासाठी अत्यंत गरजेचे असल्याची माहिती या अहवालात देण्यात आली आहे. स्वत: फिट राहिलात तर देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देता येईल, हे प्रत्येक नागरिकाने समजून घ्यायला हवे.

**विविध कारणांमुळे लठ्ठपणा**

आजच्या काळात वारंवार जंक फूडचे सेवन करणे, व्यायाम न करणे, सतत मोबाईलचा वापर, अपूर्ण झोप अशा सर्व गोष्टींमुळे स्थूलपणा तसेच शरीरातील चरबीचे प्रमाण वाढत आहे. थोडक्यात लठ्ठपणा ही भारतीयांमध्ये झपाट्याने वाढणारी समस्या बनत आहे. लठ्ठपणामुळे तुमचे व्यक्तिमत्व बिघडतेच; शिवाय अन्य त्रासही संभवतात. लठ्ठपणामुळे एखादी व्यक्ती फॅटी लिव्हर, मधुमेह, कोलेस्टेरॉल, हृदयविकार, उच्च रक्तदाब, पक्षाघात आणि कर्करोग यासारख्या घातक आजारांनाही बळी पडू शकते. मात्र जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या सवयी चांगल्या ठेवल्या तर तुम्ही या आजारांपासून तुम्ही दूर राहू शकता. लठ्ठपणाचा सामना करण्यासाठी निरोगी जीवनशैलीचा अवलंब करणे आणि पोषकतत्वांनी समृद्ध आहार घेणे महत्त्वाचे आहे.



## घशातील जखमांकडे करू नका दुर्लक्ष

भारतात सर्व कॅन्सर रुग्णांपैकी अंदाजे २६ टक्के ते ३० टक्के रुग्णांना हेड आणि नेक कॅन्सर असल्याची माहिती आहे. तंबाखू, गुटखा, बीडी, सिगारेट आणि इतर सवयी ही त्याची प्रमुख कारणे आहेत. हे प्रमाण इतर कर्करोगांच्या तुलनेत अधिक आहे. जागतिक आरोग्य संघटनेंतर्गत 'आयएआरसी'-ग्लोबल कॅन्सर ऑब्झर्व्हेशनुसार जगभरात सुमारे ९.३ ते ९.५ लाख नवीन हेड आणि नेक कॅन्सरची प्रकरणे नोंदवली गेली आहेत. देशात दरवर्षी सुमारे १० ते १२ लाख नवीन कर्करोगाचे रुग्ण आढळतात. यापैकी जवळपास ३० टक्के कर्करोग हे 'हेड अँड नेक' कर्करोगाचे असतात.

**तोंडात किंवा घशामध्ये झालेली जखम, गाठ किंवा आवाजात झालेला बदल याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते; मात्र हीच लक्षणे हेड आणि नेक कॅन्सरची सुरुवातीची लक्षणं असू शकतात, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.**



तंबाखू, गुटखा, धूम्रपान, दारूचे व्यसन तसेच काही विषाणुजन्य संसर्ग ही या कॅन्सरची प्रमुख कारणे मानली जातात. विशेष म्हणजे हा कॅन्सर सुरुवातीच्या टप्प्यात ओळखला गेल्यास पूर्णपणे बरा होण्याची शक्यता अधिक असते. तज्ज्ञांच्या मते तोंडात तीन आठवड्यांपेक्षा जास्त काळ बरी न होणारी जखम, गालाच्या आत पांढरे किंवा लाल चट्टे, पाणी किंवा पदार्थ गिळताना त्रास होणे, सतत घसा दुखणे, मानेला गाठ येणे किंवा आवाजात बदल होणे ही लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

जाणून घ्या

बहुतेक रुग्ण डॉक्टरांकडे जाण्यास विलंब करतात. सुरुवातीच्या टप्प्यात आढळलेला 'हेड-नेक कॅन्सर' ८० ते ९० टक्के प्रकरणांमध्ये यशस्वीरीत्या बरा होऊ शकतो. त्यामुळे तोंडातील कोणत्याही जखमेकडे दुर्लक्ष करु नका. तंबाखू आणि दारूच्या व्यसनांमुळे 'हेड अँड नेक कॅन्सर'चा धोका अनेक पटींनी वाढतो. जनजागृती, नियमित तपासणी आणि सवयींमध्ये बदल हेच या कॅन्सरपासून संरक्षणाचे प्रभावी मार्ग आहेत.

'हेड आणि नेक कॅन्सर'चा धोका टाळता येऊ शकतो, यासाठी योग्य जीवनशैली आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. तंबाखू, गुटखा, खैनी, मावा, सुपारी, बीडी आणि सिगारेटचे सेवन हे या कॅन्सरला कारणीभूत घटक आहे. तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन टाळणे हा प्रतिबंधाचा पहिला आणि प्रभावी उपाय आहे. दारूचे सेवन पूर्णपणे बंद करणे, तंबाखू, दारू आणि सुपारी यांचा एकत्रितरित्या वापर हा 'हेड अँड नेक कॅन्सर'चा धोका अनेक पटींनी वाढवतो.

मौखिक स्वच्छता राखणे आणि नियमित दंत तपासणी करून घेणे हेही प्रतिबंधाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. संतुलित आणि पोषक आहार, विशेषतः फळे व हिरव्या भाज्यांचा समावेश केल्यास शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. तोंडात किंवा घशात झालेली कोणतीही जखम, गाठ किंवा असामान्य बदल २ ते ३ आठवड्यांपेक्षा जास्त काळ दिसून आल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता त्वरित तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे योग्य राहिल. विशेषतः पूर्वी तंबाखू सेवन करत असलेल्या व्यक्तींनी नियमित आरोग्य तपासणी करून घ्यावी,


## मेंदूच्या शस्त्रक्रियांमध्ये क्रांती

तंत्रज्ञान... मेंदू आणि मणक्याच्या आजारांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असताना, न्यूरोसर्जरीच्या क्षेत्रात झालेली प्रगती ही रुग्णांसाठी दिलासादायक ठरत आहे. अलिकडच्या वर्षांमध्ये मेंदू आणि मणक्याच्या शस्त्रक्रियांमध्ये मोठी क्रांती झाली असून, आधुनिक तंत्रज्ञानामुळे उपचार अधिक सुरक्षित, अचूक आणि परिणामकारक ठरत आहेत.

ओग्यतंत्र

मेंदू आणि मणका हे शरीरातील सर्व नसा नियंत्रित करणारे प्रमुख केंद्र असल्याने, ट्यूमर, स्ट्रोक, स्लिप डिस्क, स्पाइनल नर्व्ह कॉम्प्रेशन किंवा संसर्ग यांसारख्या समस्यांचा थेट परिणाम हालचाल, स्मरणशक्ती, संतुलन आणि दैनंदिन जीवनावर होतो. न्यूरोसर्जरीमध्ये आता मोठ्या शस्त्रक्रियांऐवजी 'मिनीमली इन्व्हेसिव्ह' पद्धतींचा वापर वाढला आहे. या तंत्रामुळे जखम कमी होते, संसर्गाचा धोका घटतो, रुग्ण लवकर बरा होतो आणि रुग्णाचा रुग्णालयातील कालावधीही कमी होतो. पार्किन्सन्स रोग आणि सतत थरथरणे यांसारख्या आजारांमध्ये डीप ब्रेन स्टिम्युलेशन ही पद्धत प्रभावी ठरत आहे. या उपचारात मेंदूतील विशिष्ट भागात इलेक्ट्रोड बसवून मेंदूचे सिग्नल नियंत्रित केले जातात. त्यामुळे रुग्णांच्या हालचाली सुधारतात आणि जीवनमान उंचावते.





मणक्याच्या शस्त्रक्रियांमध्ये आता रोबोटिक-असिस्टेड तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. ट्यूमर काढणे किंवा 'स्पाइनल फ्यूजन'सारख्या शस्त्रक्रियांमध्ये रोबो सर्जनला अधिक अचूकतेने काम करण्यास मदत करतात. त्यामुळे गुंतागुंत कमी होते आणि रुग्ण लवकर बरा होतो. तंत्रज्ञानाचा वेगाने होत असलेला विकास पाहता, भविष्यात मेंदू आणि मणक्याच्या आजारांवरील उपचार अधिक प्रभावी होतील. या प्रगतीमुळे जगभरातील असंख्य रुग्णांचे जीवनमान सुधारण्यास मदत होणार आहे.

## मातामृत्यूची गंभीर समस्या

संयुक्त राष्ट्र आणि जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, २०२३ मध्ये गर्भधारणा आणि बाळंतपणाशी संबंधित प्रकरणांमध्ये जवळजवळ प्रत्येक दोन मिनिटाला एक महिला मरते किंवा या कारणामुळे दररोज ७०० पेक्षा जास्त महिलांचा मृत्यू होतो, असे समोर आले आहे.

आरोग्यविशेष

अहवालात असे दिसून आले आहे, की २००० ते २०२३ या कालावधीत जगभरातील मातामृत्यूच्या संख्येत ४० टक्क्यांनी घट झाली आहे. आधी प्रति १,००,००० जिवंत जन्मांमागे मातामृत्यूची संख्या अधिक होती. मात्र २०१६ पासून सुधारणेचा वेग मंदावला असल्याचेही स्पष्ट झाले आहे. त्याचमुळेच एका अंदाजानुसार २०२३ मध्ये जगभरातील दोन लाख ६० हजार स्त्रिया गरोदरपणात किंवा बाळंतपणाच्या गुंतागुंतीमुळे मरण पावल्याचे समोर आले आहे. ९० टक्क्यांहून अधिक मातामृत्यू कमी वयाच्या मातांचे होतात.



**मातृत्वाच्या सुरक्षेचा अधिकार**

हा अहवाल सद्यस्थिती समोर आणणारा म्हणावा लागेल. आज वैद्यकशास्त्र प्रगत आहे. मातामृत्यू रोखण्यासाठी गर्भारपणात करावे असे अनेक उपचारपद्धती उपलब्ध आहेत. वेगवेगळ्या तपासण्यांमधून गर्भारपण मातेच्या जीवास त्रासदायक आहे की नाही, हे जाणून घेता येते. मात्र असे असूनही आज जगातील बहुतांश भागात गर्भधारणा धोकादायक ठरत आहे. उपलब्ध आकडेवारीवरुन ही बाबही स्पष्ट होते. त्यामुळे मातृत्वाचा आनंद घेऊ इच्छिणाऱ्या महिलांनी आपल्या सुरक्षेचे अधिक काळजी घ्यायला हवी. आपली सुरक्षाव्यवस्था बळकट करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी जाणून घ्यायला हवे.

**कोविडनंतर ४० हजार महिलांचा मृत्यू**

या अहवालात मातेच्या जीवनावर कोरोना साथीच्या आजाराच्या प्रभावाचे पहिले जागतिक अवलोकनदेखील सादर केले आहे. अंदाजानुसार, २०२१ मध्ये ४० हजारांहून अधिक महिलांचा गर्भधारणा किंवा बाळंतपणामुळे मृत्यू झाला. २०२० मध्ये ही संख्या दोन लाख ८२ हजार होती. पुढे ती तीन लाख २२ हजारांपर्यंत वाढली. अहवालात असे म्हटले आहे, की कोरोना संसर्गामुळे थेट गुंतागुंत होण्याव्यतिरिक्त हे मृत्यू मोठ्या प्रमाणात सेवांमधील व्यत्ययांमुळे देखील झाले.

**तातडीच्या सेवेची गरज**

या सर्व माहितीवरुन महामारी आणि इतर आपत्कालीन परिस्थितीत आरोग्यसेवा सुनिश्चित करण्याचे महत्त्व अधोरेखित होते. गर्भवती महिलांसाठी नियमित सेवा आणि तपासणी तसेच काळजी घेणे आवश्यक आहे, असे अहवालात म्हटले आहे. याची गांभीर्याने दखल घ्यायला हवी.

## लक्षणाशिवायही बळावतात आजार

ऑफिसमधील कामाचा ताण, घराची जबाबदारी.. अशा अनेक गोष्टींमुळे आपण आपल्या आरोग्याकडे लक्ष देतच नाही. परणामी एखाद्या दिवशी आपण एका गंभीर आजाराच्या विळख्यात सापडतो आणि त्याचे लक्षणदेखील आपल्याचा जाणवत नाही. सहसा, शरीराच्या कोणत्याही भागात वेदना, थोडा थकवा किंवा जळजळ जाणवल्यास आपल्याला वाटते, की आपले आरोग्य ठीक नाही; परंतु काही आजार कोणत्याही स्पष्ट लक्षणांशिवाय शरीरात हळूहळू वाढतात. यांना 'शांत आजार' म्हणजे 'सायलेंट डिसीज' असे म्हणतात. असे आजार आरोग्याला गंभीर हानी पोहोचवू शकतात. शिवाय, ते उशिरा लक्षात येण्याचा धोकाही असतो.

आरोग्यचर्चा



तज्ज्ञांनी सांगितल्यानुसार, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयाच्या समस्या, थायरॉईडचे असंतुलन आणि काही प्रकारचे कर्करोग सुरुवातीच्या टप्प्यात लक्षणे दाखवत नाहीत. ते हळूहळू शरीराच्या अवयवांना नुकसान पोहोचवतात. बरेच लोक सहसा थकवा आणि सुस्तीकडे दुर्लक्ष करतात. पुढे, यामुळे गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. काही आजार हळूहळू वाढतात. त्यामुळे त्यांची लक्षणे लगेच दिसून येत नाहीत. शरीर काही काळ अंतर्गत बदलांमध्ये संतुलन राखण्याचा प्रयत्न करते. परिणामी, व्यक्तीला कोणतीही अस्वस्थता जाणवत नाही. तसेच, सुरुवातीची लक्षणं इतकी सौम्य असतात की त्यांना सामान्य समजून त्याकडे दुर्लक्ष केलं जातं.

अशा आजारांना प्रतिबंध करण्यासाठी नियमित आरोग्य तपासणी करून घेणे खूप महत्त्वाचे आहे. वर्षातून एकदा किंवा डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आरोग्य तपासणी करून घेणे उत्तम ठरेल. संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि तणावाचे व्यवस्थापन आरोग्य टिकवून ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे, शरीरातील किरकोळ बदलांकडेही दुर्लक्ष करू नये. कोणतीही लक्षणे दिसल्यास, ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

आजाराचे वेळेवर निदान झाल्यास उपचार करणे सोपे जाते. यामुळे, भविष्यात उद्भवू शकणाऱ्या गंभीर समस्या टाळता येतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणतेही बदल करण्यापूर्वी सर्वात आधी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## रात्रीही उष्माघाताचा धक्का शक्य?

उन्हाळ्याच्या वाढत्या तीव्रतेने आता एक महत्त्वाची समजूत मोडून काढली आहे. उष्णतेचा धोका फक्त दिवसापुरता मर्यादित असतो. प्रत्यक्षात, वाढते तापमान आणि दमट वातावरण यामुळे रात्रीही शरीरावर तितकाच ताण येऊ शकतो. याच ठिकाणी 'हीट स्ट्रोक'सारख्या गंभीर स्थितीचा धोका अधिक वाढतो. शहरांमध्ये झपाट्याने वाढणारे काँक्रीटचे जंगल, कमी होत चाललेली हरितक्षेत्रे आणि उष्णता साठवून ठेवणारी बांधकाम रचना यामुळे रात्रीची उष्णता कमी होण्याऐवजी टिकून राहते.

व्याधी विकार




परिणामी, दिवसाची झळ संपल्यानंतरही शरीराला विश्रांती मिळत नाही. रात्रीच्या उष्णतेचा हा परिणाम अनेकदा दुर्लक्षित राहतो, कारण लोकांच्या मनात अजूनही 'रात्र म्हणजे आराम' हीच धारणा आहे; परंतु वास्तव वेगळे आहे. दिवसभराच्या उष्णतेनंतर शरीराला नैसर्गिकरीत्या थंड होण्याची गरज असते. रात्रीचे तापमानही जास्त राहिले, तर शरीराला सामान्य स्थितीत परत येण्याची संधी मिळत नाही. यामुळे शरीरातील तापमान नियंत्रित ठेवणारी यंत्रणा सतत कार्यरत राहते आणि त्यावर अतिरिक्त ताण येतो. अशा परिस्थितीत 'हीट स्ट्रोक' चा धोका वाढतो.

या समस्येला आणखी तीव्र करणारा घटक म्हणजे आर्द्रता. हवेत आर्द्रता जास्त असते तेव्हा शरीरातून बाहेर पडणारा घाम सहजपणे वाफ होऊन उडत नाही. घामाचे बाष्पीभवन हे शरीर थंड ठेवण्याचे मुख्य साधन आहे; पण आर्द्रता जास्त असल्यास ही प्रक्रिया मंदावते. परिणामी, शरीराचे तापमान कमी होण्याऐवजी वाढत राहते. त्यामुळे रात्रीही उष्णतेचा ताण कायम राहतो आणि 'हीट स्ट्रोक'चा धोका अधिक गडद होतो. शहरी जीवनशैलीदेखील या संकटाला हातभार लावते. लहान, बंद आणि हवेशीरपणाचा अभाव असलेली घरे, कमी व्हेंटिलेशन, आणि वातानुकूलनाच्या अपुऱ्या सुविधा यामुळे घरातील तापमान बाहेरील उष्णतेइतकेच किंवा त्याहून अधिक राहते.

### नवसंशोधन

## हार्मोन्समुळे लागते भूक!

आपण दिवसभर कामात असतो. मात्र संध्याकाळी घरी गेल्यावर प्रचंड भूक लागते. अशा वेळी खाण्याचा मोह आवरू शकत नाही. संध्याकाळच्या वेळी हार्मोन्समध्ये होणाऱ्या बदलांमुळे भुकेची तीव्रता बरीच वाढलेली असते. यामुळे आपलं अतिखाणं होतं. वेफर्स, भजी यासारखे आरोग्यासाठी हानिकारक असणारे पदार्थ या वेळी खाल्ले जातात. अलिकडेच संध्याकाळच्या वेळी अतिखाणं होण्यामागची कारणं जाणून घेण्यासाठी एक संशोधन करण्यात आलं. त्यातून हार्मोन्समधल्या बदलांमुळे संध्याकाळी अतिखाणं होत असल्याची बाब समोर आली आहे. 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ ओबेसिटी' मध्ये हे संशोधन प्रकाशित झालं आहे.



### दंतारोग्य

## दातांचा पिवळेपणा दूर केल्यानंतर...

पांढरेशुभ्र, मोत्यासारखे चमकणारे दात व्यक्तिमत्त्व खुलवतात. मात्र विविध कारणांमुळे दात पिवळे पडतात. दातांची चमक पुन्हा मिळवण्यासाठी काही उपचार केले जातात. मात्र याबाबत अनेक गैरसमज प्रचलित आहेत. दातांचा पिवळेपणा दूर करण्यासाठी उपचार घेतल्यानंतर चहा-कॉफी घेता येत नाही, असं अनेकांना वाटतं. पण प्रत्यक्षात चहा, कॉफीसारखी पेयं काही दिवस टाळण्याचा सल्ला दिला जातो. उपचारांनंतर दातांमधली छिद्रं भरेपर्यंत डाग पडण्यास कारणीभूत ठरणारी पेयं तसंच खाद्यपदार्थांचं सेवन करायचं नसतं. त्यानंतर तुम्ही या पदार्थांचं सेवन करू शकता.



### डोळ्यांचे आरोग्य

## कॉन्टॅक्ट लेन्स पाण्यात ठेवू नका

कॉन्टॅक्ट लेन्स काढल्यानंतर त्या सोल्यूशनमध्ये ठेवल्या जातात. मात्र एखाद्यावेळी तुमच्याकडचं सोल्यूशन संपलं तर कॉन्टॅक्ट लेन्स पाण्यात ठेवण्याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. मात्र कॉन्टॅक्ट लेन्स पाण्यात ठेऊ नये. तसंच पोहायला जाताना लेन्स काढून ठेवाव्या. पाण्यातले सूक्ष्मजंतू या कॉन्टॅक्ट लेन्सवर वाढतात. अशा लेन्स घातल्यानंतर तुम्हाला नेत्रविकार होऊ शकतात. क्वचित प्रसंगी अंधत्वही येऊ शकतं. कॉन्टॅक्ट लेन्सचे मायोपिया, हायपर ऑट्रोपिया आणि ॲस्टिगमेटिझम तसेच बहु-फोकल लेन्स, रंगीत लेन्स असे प्रकार आहेत. रंगीत लेन्स हे डोळ्यांचा रंग बदलण्यासाठी वापले जातात.



### आजीबाईचा बटवा

## गुणकारी तमालपत्र

तमालपत्र पदार्थाची चव वाढवतं. हे साधंसं वाटणारं तमालपत्र खूप गुणकारी आहे. तमालपत्रातले काही घटक कर्करोग तसंच हृदयाशी संबंधित विकारांना प्रतिबंध करू शकतात. पाय मुरगळल्यावर संबंधित भागावर तमालपत्राचा लेप लावल्यास आराम मिळतो. तमालपत्राच्या काढ्यामुळे नसांना आलेली सूज कमी होते. तमालपत्र ही एक औषधी वनस्पती आहे. ती शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते. हे किडनीच्या आरोग्यास मदत करते.



तमाल पत्र पाण्यात उकळून पिल्यास वजन कमी होण्यास मदत होते यामध्ये असणारे अँटीऑक्सिडंट घटक शरीराची प्रतिकारशक्ती वाढवतात.

# शब्दगंध साहित्य संमेलनामुळे नव्या पिढीत वाचन संस्कृती रुजणार

**मंत्री दत्ता भरणे यांचे प्रतिपादन, स्व. अरुणकाका साहित्य नगरी १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचे उद्घाटन, प्रा. डॉ. गणी पटेल आणि आयु. अशोकराव गायकवाड यांना शब्दगंध जीवनगौरव पुरस्कार प्रदान**

नगर – राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनामुळे नव्या पिढीत वाचनाची आवड निर्माण होणार आहे. 'वाचाल तर वाचाल' हा संदेश आजच्या युवकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. वाचनामुळे विचार समृद्ध होतात, चुकीच्या प्रवृत्तींपासून दूर राहता येते आणि जीवनाला सकारात्मक दिशा मिळते, असे यावेळी मार्गदर्शन करताना क्रीडा व युवक कल्याण तथा कृषी मंत्री दत्तात्रय विठ्ठल उर्फ दत्ता भरणे म्हणाले.

ते पुढे म्हणाले, जीवनात घडण्यासाठी प्रत्येकाला कष्ट आणि चिकाटी आवश्यक असते. कोणाकडेही जादूची कांडी नसते. मी कृषी मंत्री झालो असलो तरी शेवटी शेतकऱ्याचाच मुलगा आहे. साहित्य संमेलन ही केवळ गर्दी नसून विचारवंतांची मेजवानी असते. येथे विचारांची देवाणघेवाण होते आणि समाजात वैचारिक संस्कार घडतात.



शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या स्व. अरुणकाका साहित्य नगरीचे उद्घाटन करताना मंत्री दत्ता भरणे, आ. संग्राम जगताप आदी.

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या स्व. अरुणकाका साहित्य नगरीचे उद्घाटन उत्साहात पार पडले. मंत्री दत्ता भरणे यांच्या हस्ते या साहित्य नगरीचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, डॉ. पुरुषोत्तम भापकर, संपत बारस्कर, कुमार वाकळे, गणेश भोसले, महेश लोंढे, प्रकाश भागानगरे, मोहित पंजाबी, प्रा. डॉ. संदीप सांगळे, डॉ. संजीवनीताई तडेगावकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शाहिरी जलसा कार्यक्रमाने संमेलनाला विशेष रंगत आणली. शाहीर कल्याण काळे, भारुड सम्राट हमीद सय्यद, शाहीर भारत गाडेकर, वसंत डंबाळे, डॉ. शेषराव पठाडे, प्रशांत सूर्यवंशी, दिगंबर गोंधळी आणि हौसीनाथ बोर्डे आदी कलाकारांनी आपल्या प्रभावी सादरीकरणातून उपस्थितांची दाद मिळवली.

स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे यांनी प्रस्ताविकातून संमेलनाची भूमिका स्पष्ट केली.

या संमेलनात प्रा. डॉ. गणी पटेल आणि आयु. अशोकराव गायकवाड यांना शब्दगंध जीवनगौरव पुरस्कार कृषिमंत्री दत्ता भरणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

संमेलनादरम्यान विविध विषयांवरील परिसंवाद, काव्य संमेलन, गझल मैफल, चर्चासत्रे तसेच पुस्तक प्रकाशनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. आधुनिक साहित्यातील स्त्री जीवनाचे चित्रण, बदलते ग्रामीण जीवन आणि ग्रामसंस्कृती तसेच असा मी घडलो... यांसारख्या विषयांवर साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते आणि अभ्यासक मार्गदर्शन करणार आहेत.

रविवारी होणाऱ्या समारोप कार्यक्रमास पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण उपस्थित राहणार असून, विविध साहित्य पुरस्कारांचे वितरण आणि शब्दसंचित ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

साहित्यिक, कवी, लेखक आणि साहित्य रसिकांनी उपस्थित राहून संमेलनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे, शब्दगंधचे संस्थापक सुनील गोसावी, अध्यक्ष राजेंद्र उदागे आणि संयोजन समितीच्या सदस्यांनी केले आहे.

---


## ड्रोनच्या साहाय्याने प्रभागाचा डिजिटल नकाशा तयार

**जनगणना कार्यात डॉ. अमोल बागुल यांचा अभिनव उपक्रम**

नगर – भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या डिजिटल जनगणना उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात जनगणनेच्या पूर्वतयारीचे काम वेगाने सुरू आहे. याच अंतर्गत प्रगणक म्हणून कार्यरत असलेले शिक्षक डॉ. अमोल बागुल यांनी आपल्या कार्यक्षेत्रात तंत्रज्ञानाधिष्ठित अभिनव उपक्रम राबविला आहे.



महानगरपालिका क्षेत्रात जनगणनेच्या पूर्वतयारीचे कामा अंतर्गत प्रगणक म्हणून कार्यरत असलेले शिक्षक डॉ. अमोल बागुल यांनी आपल्या कार्यक्षेत्रात तंत्रज्ञानाधिष्ठित अभिनव उपक्रमाबाबत आयुक्त यशवंत डांगे यांना माहिती दिली.



त्यांना नेमून दिलेल्या प्रभागाचा अचूक व अद्ययावत नकाशा तयार करण्यासाठी त्यांनी आधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर केला. ड्रोनद्वारे संपूर्ण परिसराचे हवाई छायाचित्रण करण्यात आले. त्याच्या आधारे प्रभागातील रस्ते, घरे, गल्ल्या, प्रमुख ठिकाणे तसेच भौगोलिक रचना यांचे बारकाईने निरीक्षण करण्यात आले. या माहितीच्या आधारे जनगणना कार्यासाठी उपयुक्त असा अचूक व अद्ययावत नकाशा तयार करण्यात आला.

याप्रसंगी आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी यशवंत डांगे यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे घरांची अचूक नोंद, क्षेत्रनिहाय नियोजन तसेच घरभेटी घेणे अधिक सुलभ होणार आहे. त्यामुळे जनगणना प्रक्रियेतील अचूकता वाढण्यास मोठी मदत होईल. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जनगणना कार्य अधिक प्रभावी करण्याचा हा प्रयत्न इतर प्रगणकांसाठीही प्रेरणादायी ठरत असून, अशा उपक्रमांमुळे प्रशासनाच्या कामकाजात अधिक परिणामकारकता येईल.

या वेळी सहायक आयुक्त मेहेर लहारे, प्रभाग अधिकारी बाळासाहेब पवार, मास्टर ट्रेनर डॉ. संतोष देशमुख, रफिक देशमुख, पर्यवेक्षक अलका दहातोंडे, प्रगणक व कर्मचारी उपस्थित होते.

याविषयी बोलताना डॉ. बागुल यांनी सांगितले की, जनगणना ही अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय प्रक्रिया आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास हे कार्य अधिक अचूक, सुलभ आणि परिणामकारक होऊ शकते. त्याच उद्देशाने ड्रोनच्या साहाय्याने नकाशा तयार करण्याचा हा प्रयत्न करण्यात आला.

अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रातील या नाविन्यपूर्ण उपक्रमाची नागरिकांसह शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रात चर्चा सुरू असून, डिजिटल भारताच्या दिशेने टाकलेले प्रभावी पाऊल म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

---

## तहसील प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात ठिय्या

**शेतजमिनीच्या रस्त्याचा प्रश्न तात्काळ मार्गी लावा; लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित**

नगर – मौजे टाकळी खादगाव, ता. अहिल्यानगर येथील सौ. सविता संजय पादीर व त्यांचे सासरे देवराम पादीर यांच्या मालकीच्या शेतजमिनीकडे जाणारा पारंपरिक रस्ता काही व्यक्तींनी बेकायदेशीररित्या अडवल्याचा आरोप करण्यात आला असून, या प्रकरणात तहसील प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईविरोधात संबंधित कुटुंबाने अखेर अहिल्यानगर तहसील कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले होते.



मौजे टाकळी खादगाव येथील सौ. सविता पादीर व त्यांचे सासरे देवराम पादीर यांच्या मालकीच्या शेतजमिनीकडे जाणारा पारंपरिक रस्ता काही व्यक्तींनी बेकायदेशीररित्या अडवल्याचा प्रकरणात तहसील प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईविरोधात तहसील कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले.

शेती हा उपजीविकेचा मुख्य आधार असताना शेतात जाण्यासाठीचा रस्ता बंद झाल्याने संबंधित कुटुंबाला मानसिक, आर्थिक व सामाजिक त्रास सहन करावा लागत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. या संदर्भात सविता संजय पादीर यांनी जून २०२४ मध्ये अहिल्यानगर तहसील कार्यालयात लेखी तक्रार अर्ज दाखल करून रस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली होती. मात्र, दीर्घ कालावधी उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर २७ मे २०२५ रोजी राज्याच्या महसूल मंत्र्यांकडेही लेखी तक्रार सादर करण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत तब्बल सात महिन्यांनी, ९ जानेवारी २०२६ रोजी नायब तहसीलदार गौरव दळवी यांनी टाकळी खादगाव येथे प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली होती. त्यावेळी दोन ते चार दिवसांत प्रश्न मार्गी लावण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते.

मात्र, त्यानंतरही जवळपास पाच महिने उलटून गेले असून कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे संबंधित कुटुंबाचे म्हणणे आहे. तहसील कार्यालयाच्या वारंवार चकरा मारूनही केवळ उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत असल्याने संतप्त झालेल्या कुटुंबाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश मोहन पोटे यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालयासमोर आंदोलन सुरू केले. यावेळी सौ. सविता पादीर, संजय पादीर व अन्य कार्यकर्ते सहभागी झाले होते. जोपर्यंत शेतरस्त्याचा प्रश्न मार्गी लागत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला होता.

दरम्यान, निवासी नायब तहसीलदार यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. प्रशासनाच्या पत्रात संबंधित प्रकरणी स्थळ निरीक्षण पंचनामा करण्यात आल्याचे तसेच वादी व प्रतिवादी यांची सुनावणी घेण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. जनगणना कामकाजामुळे निर्णयास विलंब झाल्याचे स्पष्ट करत, २५ मे पर्यंत नियमोचित व गुणवत्तेवर आधारित निर्णय देण्याची दक्षता घेण्यात येणार असल्याचे आश्वासन प्रशासनाने दिले आहे.

---

## युवा पिढीमध्ये धर्माभिमान जागवण्यासाठी नगरमध्ये २४ ते ३० मे या कालावधीत हिंदु धर्मसंस्कार शिबीर

नगर – आजच्या तरुण पिढीमध्ये हिंदु धर्माचे सखोल ज्ञान, उच्च संस्कार व स्वाभिमान निर्माण करण्याच्या उद्देशाने 'हिंदु जनजागृती समिती' च्या वतीने सावेडी परिसरामध्ये २४ ते ३० मे या कालावधीत 'हिंदु धर्मसंस्कार शिबिर' आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संयोजकांनी दिली आहे. धर्माचरणी युवा हीच राष्ट्राची खरी संपत्ती आहे, हा विचार डोळ्यांसमोर ठेवून या सात दिवसीय शिबिराचे नियोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये युवा वर्गासाठी विविध स्तरांवर मार्गदर्शन केले जाणार आहे.

शिबिरातील मुख्य आकर्षणे आणि विषय – मूलभूत संस्कार : हिंदु धर्मातील आचार–विचार आणि दैनंदिन जीवनातील संस्कारांचे महत्त्व.,

शारीरिक प्रशिक्षण : स्वसंरक्षण आणि शारीरिकदृष्ट्या सक्षम बनण्यासाठी विशेष प्रशिक्षण व सिद्धता.,

बौद्धिक प्रबोधन : राष्ट्राप्रती आणि धर्माप्रती असलेल्या कर्तव्यांची जाणीव जागृती.,

शिबिराचा तपशील: कालावधी : २४ ते ३० मे., वेळ: दररोज दुपारी ४:३० ते सायंकाळी ७:०० वाजेपर्यंत., स्थळ : श्री श्रमिक बालाजी देवस्थान, श्रमिकनगर, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर.

वयोगट: १५ ते ३० वर्षे (युवक आणि युवतींसाठी)., प्रवेश: पूर्णपणे नि:शुल्क (मोफत)

नोंदणीचे आवाहन : या शिबिरामध्ये सहभागी होण्यासाठी आगाऊ नोंदणी करणे आवश्यक आहे. इच्छुकांनी https://forms.gle/uhXUXu5QVUDF6A8SA या गुगल फॉर्म लिंकवर जाऊन आपली नोंदणी करावी. तसेच अधिक माहितीसाठी ८३२९३०२९५५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन हिंदु जनजागृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे. सावेडी परिसरातील युवक युवतींनी याचा लाभ घ्यावा, असेही आयोजकांनी म्हटले आहे.

---

## केडगाव स्पोर्ट्स ॲकॅडमीच्या बास्केटबॉल लीगला प्रतिसाद १४ वर्षाखालील मुला–मुलींनी दाखवली दमदार खेळी

नगर – केडगाव स्पोर्ट्स ॲकॅडमी आयोजित १४ वर्षाखालील मुला–मुलींची बास्केटबॉल लीग स्पर्धा ऊर्जा गुरुकुल स्कूल, केडगाव येथे झाली. जिल्ह्यातील उदयोन्मुख खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित स्पर्धेला खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमींचा प्रतिसाद लाभला.




**ऊर्जा गुरुकुल स्कूलमध्ये रंगली स्पर्धा**

केडगाव स्पोर्ट्स ॲकॅडमीचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रशिक्षक छबुराव कोतकर आणि सौ. स्वाती बाराहाते यांच्या नियोजनातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, चपळ हालचाली आणि क्रीडाभावनेचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली.

स्पर्धेसाठी सचिन अग्रवाल, ओमसिंग बायस, मार्शल सर, हर्षल शेलोत, ऊर्जा गुरुकुलच्या संचालिका सौ. कल्याणी फिरोदिया, ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसचे प्रसाद जमदाडे, प्रसाद आंधळे आदी उपस्थित होते. विजेत्या संघांना पारितोषिके व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

प्रशिक्षक छबुराव कोतकर म्हणाले, शहरी भागातील मुला–मुलींमध्ये बास्केटबॉलसारख्या खेळाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांना दर्जेदार प्रशिक्षण मिळावे, हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश आहे. खेळाडूंचा उत्साह आणि पालकांचा प्रतिसाद पाहता भविष्यात आणखी मोठ्या स्तरावर स्पर्धा आयोजित करण्याची प्रेरणा मिळाली आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सहकारी, प्रशिक्षक आणि स्वयंसेवकांचे ॲकॅडमीच्या वतीने आभार मानण्यात आले.

---



एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रमाचा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर करताना विनायक देशमुख.

## एकल महिला सक्षमीकरण अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर

**विनायक देशमुख यांची माहिती**

नगर – जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पा. यांच्या संकल्पनेतून अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू असलेल्या एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रमाचा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर करण्यात आला असून मुख्यमंत्र्यांनी या कामाबद्दल समाधान व्यक्त केले, अशी माहिती भाजपाचे जिल्हा समन्वय तथा कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख यांनी दिली.

शिर्डी येथे आगमनप्रसंगी विनायक देशमुख यांनी ना.देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना जिल्ह्यातील एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रमांचा अहवाल सादर करुन जिल्ह्यात सुरू असलेल्या या कामाची थोडक्यात माहिती दिली. सदर माहिती ऐकून श्री. फडणवीस यांनी या कामाबद्दल समाधान व्यक्त केले असे श्री. देशमुख यांनी सांगितले.

याप्रसंगी पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पा. हे उपस्थित होते.

---

## वृद्धांच्या मदतीसाठी मदतीचे आवाहन

**साथी हाथ बढाना गीतांच्या मैफलीचे आयोजन**

नगर – शहरातील सामाजिक बांधिलकी जपत साथी हाथ बढाना या संकल्पनेतून एक आगळावेगळा कराओके चॅरिटी शो आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमातून जमा होणारा संपूर्ण निधी शरणपूर येथील वृद्धाश्रमातील आजी–आजोबांच्या सेवेसाठी वापरण्यात येणार आहे. हा कार्यक्रम ३१ मे रोजी सायंकाळी ६ वाजता सर्जे पुरा येथील रहमत सुलतान हॉल येथे होणार असून, विविध गायक कलाकार आपल्या सुरेल गीतांनी कार्यक्रमाची रंगत वाढवणार आहेत. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रत्येक गीतासाठी २०० रुपये योगदान ठेवण्यात आले आहे. तसेच नागरिकांना आर्थिक मदतीबरोबरच साखर, चहापत्ती, गूळ, शेंगदाणे, तेल, खोबरेल तेल, टूथपेस्ट, गहू, तांदूळ, पीठ, रवा, साबण, चादरी आदी जीवनावश्यक वस्तू दान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ज्या हातांनी आपल्याला चालायला शिकवलं, ज्यांनी आपल्या आयुष्यासाठी स्वतःचं आयुष्य झिजवलं, त्या ज्येष्ठांना आता आपल्या आधाराची गरज आहे, अशी भावनिक साद आयोजकांनी नागरिकांना घातली आहे. माणुसकीच्या या प्रवासात सहभागी होऊन वृद्धांच्या चेहऱ्यावर हसू फुलवूया, असे आवाहनही करण्यात आले आहे.

या उपक्रमासाठी युनूस तांबटकर, विद्या तन्वर, मारिया, अभिजित वाघ, राजा भैय्या, आरिफ सय्यद, जावेद मास्टर, संध्या ताई, राजूभाई शेख, शमा शेख आणि सहकारी मंडळातील सदस्य परिश्रम घेत आहेत.

अधिक माहितीसाठी व मदतीसाठी विद्या तंन्वर (८६०००३९७०२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

---

## अल करम हॉस्पिटलच्यावतीने २४ मे रोजी रक्तदान शिबीर




नगर – ईदुल अजहा निमित्त अल करम हॉस्पिटलच्या वतीने २४ मे रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सायंकाळी ५ ते रात्री ८ या वेळेत अल करम हॉस्पिटल किंग्सगेट रोड, इंगळे मेडिकलजवळ आयोजित करण्यात आले आहे.

रक्तदान करा, जीवन वाचवा हा संदेश देत नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. एका छोट्या कृतीतून एखाद्याच्या आयुष्यात नवी आशा निर्माण होऊ शकते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

रक्तदानामुळे अनेकांचे प्राण वाचण्यास मदत होते. तसेच नवीन रक्तपेशी तयार होण्यास प्रोत्साहन मिळते, हृदयाचे आरोग्य सुधारते, कॅलरीज बर्न होतात आणि मानसिक समाधान मिळते, असेही आयोजकांनी सांगितले.

याशिबिरात सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी ९९२१९९१४९२, ९५९५९७८६००, ९०२८२८९९०८ आणि ८९७५७३९२१२ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---



बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शांतता समिती व प्राणी क्लेश प्रतिबंधक जिल्हास्तरीय समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.

## सण शांततेत, सामाजिक सलोखा राखून साजरा करा

**जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे आवाहन; बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक**

नगर – बकरी ईद हा सण धार्मिक परंपरा आणि सामाजिक सलोखा राखून, शांततामय वातावरणात साजरा करण्यात यावा. शासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करत सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय राखून दक्षतेने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शांतता समिती व प्राणी क्लेश प्रतिबंधक जिल्हास्तरीय समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. बैठकीस महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त उमेश पाटील, सहायक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. मुकुंद राजळे, अन्न व औषध निरीक्षक जी. बी. भोर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, सण उत्साहात साजरा करताना कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होणार नाही, याची सर्वांनी काळजी घेणे आवश्यक आहे. प्राण्यांच्या वाहतुकीदरम्यान तसेच कत्तलीच्या प्रक्रियेदरम्यान प्राणी क्लेश प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन होणार नाही, यासाठी संबंधित यंत्रणांनी विशेष दक्षता घ्यावी. विनापरवाना जनावरांची वाहतूक, सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत कत्तल तसेच अस्वच्छता होणार नाही यासाठी संबंधित विभागांनी संयुक्तपणे कार्यवाही करावी. बकरी ईदच्या निमित्ताने काही तालुक्यांमध्ये तात्पुरत्या कत्तलखान्यांची मागणी होऊ शकते. त्या अनुषंगाने आवश्यक परवानग्या, स्वच्छता आणि नियमांचे पालन याकडे विशेष लक्ष द्यावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

कत्तलखाने तसेच इतर ठिकाणी निर्माण होणाऱ्या कचऱ्याची तातडीने विल्हेवाट लावून परिसर स्वच्छ ठेवण्यात यावा. स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणीय बाबींकडे दुर्लक्ष होणार नाही, याची दक्षता घ्यावी. नागरिकांच्या भावना, धार्मिक परंपरा आणि सार्वजनिक आरोग्य यामध्ये समतोल राखत प्रशासनाने संवेदनशीलतेने कार्य करावे, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

